# साईलीला

जानेवारी १९६३




शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

गणू महाराज विशेषांक

किंमत ५० न. पैसे

स्थापना १९१६




सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं २ टे. नं. ६९६२१



# श्री साई वाक्सुधा

या जगांत अपरंपार प्राणि जन्माला येताहेत व जाताहेत, परंतु ईश्वरी ज्ञान, अध्यात्म जाणण्याची ज्याची ताकद आहे असा एकमेव प्राणि म्हणजे मानवच होय. भगवंतासंबंधी ज्ञान करून घ्यावे व त्याच्या लीला इतरे. जनांसाठीं वर्णन कराव्या यासाठी तर नर जन्माची प्राप्ति, माझे वैभव व सामर्थ्य अगाध व अतर्क्य आहे. माझी शक्ति अपूर्व आहे. हा सारा माझ्या मायेचा खेळ आहे. जो कोणी भक्तिभावानें माझें चिंतन सदा. सर्वकाल करील त्यालाच माझें ज्ञान होईल व मग तो आनंद सागरांत सदासर्वकाळ पोहत राहील. प्रेक्षकांची जी आनंद संपन्नता ! तीच मज माझे खेळाची सांगता हे माझे ब्रीद आहे.

— श्रीसाईसच्चरित्


# श्री दासगणूमहाराज श्रीसाईलीला विशेषांक

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ४१ वें ] जानेवारी १९६२ [ अंक १० वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

साईबाबाच्या निस्सीम भक्तांत ह्यात असलेल्या फार थोड्या भक्तांपैकीं एक सर्वश्रेष्ठ भक्त ह. भ. प. दासगणू महाराज हे गेल्या महिन्यांत आपली इहलोकीची यात्रा संपवून निजधामास गेले हें वृत्त गेल्या अंकांतून वाचकास विदीत झाले आहेच. असख्य सताचे रसाळ चरित्र लेखक व नामवत कीर्तनकार या नात्यानें महाराष्ट्रातील आबालवृद्धास त्याचा परिचय झालेला आहे. बाबांच्या प्रेरणेने म्हणा वा कोणत्याही कारणामुळे म्हणा, त्याच्या भव्योदात्त व साधुतुल्य जीवनाचा वृत्तात गेल्या २।३ अकातून द्यायला आम्ही सुरूवात केली होती. आरंभापासून बाबांच्या पूर्ण कृपेस पात्र झालेल्या या थोर भगवद्भक्ताने जीवनभर बाबांची सेवा अनन्यभावें केली. त्यांची ही सेवा फार बोलकी व हृदयास जाऊन भिडणारी होती. ज्याकाळीं बाबाच्या अवतार-कार्याची काही निवडक लोकाशिवाय इतरेजनास फारशी माहिती नव्हती त्या ४०।५० वर्षांपूर्वीच्या काळात बाबांचे गुणगान गायला त्यानी सुरूवात केली व आपल्या परिणामकारक कीर्तनाच्या सहाय्याने त्यानी बाबाचे नांव घरोघर पोहोचविलें. ते नांव व ती भक्ति व्यक्तिमात्रास पुण्यपावन करणारी व मानवी कर्तव्याची जाणीव करून देणारी आहे ही गोष्ट स्वतःच्या मनास पटल्यामुळे त्या तारक नामाचा फायदा सर्वांनी घ्यावा व आपले जीवन उजाळून सोडावे, या सद्धेतूने त्यानी कीर्तनाचा अवलब केला. यात त्याचा स्वार्थ बिलकूल नव्हता. हें सारें ते लोककल्याणासाठी करीत होते आणि यातच त्यांची थोरवी आहे. जो कार्यक्रम हाती घेतला तो त्यानी अत्यंत यशस्वीपणें व प्रभावीपणें हाताळला.

सत म्हणजे आपले खरेखुरे वाटाडे होत. आपल्या जीवन प्रवासांतील दीपस्तंभ होत हे जाणून बाबांच्या प्रेरणेनें त्यानी दुसरी हाती घेतलेली महत्तम कामगिरी म्हणजे सत चरित्र कथन हीच होय. या दृष्टीनें त्यानी किती अपरंपार व अनेक माणसांनाही पार पाडता येणार नाही असें प्रचंड कार्य पार पाडिलें आहे. आजच्या काळांत त्या कार्याची तुलनाही करता येणार नाहीं. आज तशा प्रकारचें व त्या तोडीचे कार्य पार पाडण्यासाठीं पुढें येणारीं माणसेंही आपणास आढळून येणार नाहीत.

अवघें इंग्रजी चार इयत्तापर्यंत जेमतेम शिक्षण झालेलें, पोलिसखात्यासारख्या खात्यांत नोकरी, पोवाडे आणि लावण्या करून तमाशा करण्यांत समाधान मानून रहाणारे हे गणपत किंवा गणू वेळ येतांच या सर्वांवर लाथ मारून त्यांकडे कायमची पाठ फिरवितात व विठ्ठलभक्त किंवा साईभक्त बनून आपलें सारें जीवन संत चरित्र लेखन व हरिकीर्तन या रुपानें सत्कारणीं लावतात व 'दासगणू' या नावाने सत्पुरु-षांच्या मालिकेंत बसून यच्चयावत् लोकांच्या प्रेमादरास पात्र होतात, हा चालू



श्रीदासगणू महाराज

काळांतील एक महान् चमत्कारच होय; परंतु त्यांत चमत्कार तरी कसला ? हें गुरुकृपेचें गोड फळ होय.

मनुष्याच्या जीवनांत क्रांतीचा क्षण केव्हां येईल व त्याचें जीवन उजाळून सोडील हें सांगतां येणें कठीण आहे. 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं' म्हणतात तें खोटें नाहीं. गणपतरावासंबंधीं त्यांच्या कुटुंबीजनांस भारी काळजी वाटायची. शिक्षणाकडे लक्ष नाहीं, नोकरी धंद्याकडे लक्ष नाहीं, तमासगीर लोकांत वावरण्यामध्यें आनंद ! अशा विचित्र व्यक्तिबद्दल काळजी कां वाटूं नये ? परंतु जीवन झपाझप पावलें टाकीत चाललें होतें. सभोंवार मोहजाल व मायाजाल पसरलें होतें ! त्यांच्या तावडींतून सुटका करून घेणें महाकठीण होतें. परंतु देवदरबारी फर्मान सुटलें होतें कीं गणपतराव हे आहेत तसेच न रहातां ते दासगणू ईश्वरभक्त व संतचरित्र गायक बनावयाचे ! मार्गांत किती संकटें आलीं, मोहाचें प्रसंग किती उद्भवलें व ही पडझड चालू असतां

साईबाबांनी त्यांना शेवटी आपल्याकडे खेचलें व लोखंडाला परिसाचा स्पर्श होताच त्याचे तेजस्वी व मौल्यवान सुवर्ण बनते म्हणतात, त्याचप्रमाणे साईबाबाच्या स्पर्शाने दासगणूचे जीवन सोन्यासारखे व सुवर्ण मोलाचे झाले! 'आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळ वेळ तया लागी।' तसेंच झालें.

प्रथम श्रद्धा त्यांच्यापासून दूर दूर पळत होती, परंतु त्यांच्या जीवनात बाबावर श्रद्धा बसावी असे प्रसंग त्यांच्या जीवनात घडून आले आणि जेव्हा श्रद्धा त्यांच्या वाट्यास आली तेव्हा ती पूर्णांशानें आली. मग तेथे संशयास तीळमात्र जागा राहिली नाही. मग त्यांनी सर्वतोपरी बाबांच्या सेवेला स्वतःला वाहून घेतलें व 'करिष्ये वचनं तव' असे म्हणून दासगणू जे बाहेर पडले ते सर्वस्वी त्यांचा शब्द पाळण्यासाठी, त्यांची आज्ञा प्रमाण मानून ती सर्वपरीनें पूर्ण करण्यासाठी.

संत, सत्पुरुष हे वर म्हटल्याप्रमाणे जनतेचे आजच्या काळातील वाटाडे होत. या महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर किती संत होऊन गेले! परंतु कोणाला त्यांची खबर! त्यांचे जीवनकार्य म्हणजे स्फूर्तिचा झरा, अध्यात्ममार्गावरील वाटाड्या. एकाकाळी संतकवि महिपतीबुवांनी ते कार्य हाताळलें व त्या काळापुरतें यशस्वी रीतीनें पार पाडिलें, परंतु तदनंतरचे काय? संतांना एकत्र आणून त्यांच्या उदात्त शिकवणुकीचे पंच पक्वानाचे ताट वाढून जनतेपुढें तयार ठेवण्याचे कार्य तसेंच राहून गेलेले होते. मानवी कल्याणाच्या दृष्टीने तें कार्य कोणी-तरी योग्य माणसाने हाताळून पार पाडणे अत्यंत जरूर होतें. अध्यात्मिकदृष्ट्या व मानवी विकासाच्या दृष्टीनें ही एक मोठी गरज होती. बाबांना तिची जाणीव. दासगणूकरवीं हे कार्य करवून घ्यावयाचे असे बाबांच्या मनात आले व त्यांनी त्या महान् कार्यासाठी दासगणूंना सिद्ध केले. त्यात त्यांनी संपूर्ण सिद्धि मिळवावी अशी त्यांची तयारी करून दिली. आणि मग बाबांच्या प्रेरणेने व आशीर्वादानें त्यांनी संतचरित्राचा प्रचंड हिमालय पर्वत सर्वांपुढे उभा करून ठेविला.

दासगणूही संत महात्म्य जाणून होते. संतांचें या जगात महत्व काय व खरा संत कोण याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्या जाणीवेनें व त्या दृष्टीनें त्यांनी तें महत् कार्य हाताळिलें.

श्रीदासगणू महाराज यांनीं एके ठिकाणीं संत स्तवन किंवा संतांचें महात्म्य गायिले आहे. ते म्हणतात—

जन्ममरण हें चुकवायाला पद संतांचे धरी।
तयांचि संगत जाउनि करी॥
मताभिमाने मत्त असति जे त्याग तयांचा करी।
पडे न त्या गाबाळाच्या भरी॥

शाब्दिक बडबड वरवर बहुपरि अनुभव ना अंतरी ।
तयाच्या पासुन राही दुरी ॥
दाभीक राहती वरवर संभावित ।
त्या डामडौलि वा सार नसें किंचित ।
तो संत नव्हे जो षड्रिपुच्या अंकित ।
अद्वेष्टा नि शांत दांत जो संत तोचि भूवरी ।
गणु म्हणे वरकड सोंगे खरी ॥

किती गोड आणि हृदयंगम पद आहे हे ! त्यांत श्रीदासगणूंनी संत महिमा यथातथ्य वर्णिला आहे. आणि निरखून पारखून जे अशा संतपदाला पोहोचलेले थोर महात्मे त्यांना आढळून आले त्यांची चरित्रगाथा त्यांनी आपल्या प्रतिभाशाली वाणीनें रचिली. त्यासाठी त्यांनी २।४ वर्षे नव्हे तर तपेच्या तपे खर्ची घातलीं. किती तरी हालअपेष्टा सोसल्या. ती त्यांची तपश्चर्या होती, नव्हे ती त्यांची भगवत्सेवा होती. जनतेला पुण्यपावन करणारी व सन्मार्ग दाखविणारी संत चरित्रे गाणे हें का साधेसुधे व सहजसाध्य कार्य आहे ? तें जीवनव्यापी व जीवन सालकृत करणारें कार्य होते. तें बाबांच्या कृपाप्रसादानें त्यांनी सर्वोत्कृष्टपणें हाताळले व मुक्तेश्वर, महिपति, मोरोपंतादि जे थोर व अपरंपार काव्यरचना करणारे भक्तकवि पूर्वकाली होऊन गेले त्यांच्या मालिकेत जाऊन हक्काने बसण्याचा बहुमान त्यांनी मिळविला.

आम्ही वर म्हटल्याप्रमाणे, त्यांचे विविध स्वरूपी काव्य म्हणजे तो प्रचंड हिमालयच आहे. त्याची उंची मोजता येणें कठीण आहे. संतचरित्रात्मक ओवीबद्ध ग्रंथ, ओवीबद्ध ऐतिहासिक चरित्रें, ओवीबद्ध पौराणिक कथा, ओवीबद्ध स्तोत्रे, ओवीबद्ध टीकाग्रंथ ( अमृतानुभव, ईशावास्य, विष्णुसहस्त्रनाम वगैरेंचे स्पष्टीकरण ) श्लोकबद्ध अष्टके व स्तोत्रे, खंडकाव्ये, पोवाडे, सुभाषितें प्रासंगिक कविता, आरत्या, कीर्तनोपयोगी आख्यानें, ही आख्यानें सुमारें शंभर आहेत, भजनावली, स्फुटपदे, वगैरे विविध क्षेत्रांत व विविध स्वरूपाची काव्यरचना त्यांनी केलेली आहे. यापैकीं प्रत्येक क्षेत्रांत त्यांनी गुणाच्या त्याचप्रमाणे संख्येच्याही दृष्टीने उच्चांक गाठलेला आहे. आजच्या काळात असा महा उद्योग कधीं काळी कोणाकडून केला जाईल असें आम्हाला तरी वाटत नाहीं. सामान्यांतून अत्यंत असामान्य पदाला पोहोचलेले श्रीदासगणू महाराज ! आणि म्हणूनच ही एवढी डोळे दिपविणारी वाङ्मयीन व चिरस्थायी होऊन रहाणारी कामगिरी त्यांच्या हातून पार पडली. मराठी भाषेवर व महाराष्ट्रीय जनतेवर त्यांनीं केवढें तरी मोठें हे ऋण करून ठेविलें आहे. याची निदान साधीसुधी जाणीव तरी आम्ही करून घेतली पाहिजे.

एखाद्या थोर पुरुषाचे वाङ्मय हेच त्याचे खरेखुरे स्मारक होय. श्रीदासगणू महाराज यांचे वाङ्मय सटरफटर नसून ते चिरंजीवी वाङ्मय आहे. तसेच तें त्याच्या कर्त्याला या जगात यावच्चंद्र दिवाकरौ चिरजीव करून ठेवणारे आहे.

आमच्या अत्यल्प मतीप्रमाणें श्रीदासगणू महाराज याना ही श्रद्धाजलि वहात असता एक विचार आमच्या मनात प्रामुख्यानें आल्याशिवाय रहात नाही. कोणता तो विचार? श्रीदासगणू याचे अपरपार वाङ्मय एकत्र करून ते सर्व खंडशःप्रसिद्ध करण्याची व ते सुलभतेने जनतेच्या आटोक्यात आणून सोडण्याची कामागिरी कोणी ना कोणी पुढें येऊन व अनेकाचे सहकार्य मिळवून ती या पुढील काळांत तरी पार पाडणें अत्यत आवश्यक आहे.

श्रीदासगणू महाराजाच्या अपरपार वाङ्मयाचें महत्व जाणणारे व त्या वाङ्मयाचे अभ्यासू आमचे मित्र श्री. अनतराव आठवले यानी पुढाकार घेऊन या महत् कार्यासाठीं एखादी सघटना अविलंबेंकरून निर्माण करावी अशी त्यांना विनंती केल्यास ती अनाठायी ठरणार नाही अशी आशा आहे. अशा उपयुक्त कार्यांत त्याना किंवा जे कुणी पुढाकार घेतील त्यांना श्रीसाईबाबानी संपूर्ण यश द्यावें हीच आमची प्रार्थना आहे.

श्रीसाईबाबा व श्रीदासगणू महाराज याचे परस्पर जिव्हाळ्याचें व भक्तिभावाचे संबंध लक्षांत घेऊन श्रीदासगणू महाराज यांच्या पुण्यस्मरणास वाहिलेला हा अंक आमच्या प्रिय वाचकाच्या हातीं केवळ सेवाभावानें देण्यांत येत आहे. महाराजांचे चरित्रकार श्री. अनतराव आठवले यांच्या चरित्र ग्रंथाचा या कामी आम्हांला फार उपयोग झाला व त्याबद्दल आम्ही त्याचे आभारी आहोत.

—संपादक


**जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगट। महानिधी॥** ज्ञानेश्वर.

हीं कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालात तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरिता **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.** यांचा सल्ला घेऊन निर्धास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सिस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

# कीर्तनकार व संतचरित्रकार

# श्रीदासगणूमहाराज



ह. भ. प. श्रीदासगणू महाराज

श्रीदासगणू महाराज हे साईबाबांचे परम भक्त. बाबांची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. बाबांची योग्यता त्यानी ओळखली होती. त्यांचे आद्य गुरु श्रीवामन शास्त्री यानीं त्यांना अखेरचा निरोप देतांना बाबांची ओळख योग्य शब्दांत पटवून दिली होती. त्यामुळें ती पटण्यास वेळ कसा लागणार ?

पोलिस खात्यातील नोकरी चालू होती. वामनशास्त्री यानी दिलेल्या संदेशाचीहि आठवण होती. परंतु भेटीचा योग यावा लागतो. नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे एक परमभक्त. श्रीदासगणूंची व बाबांची पहिली भेट त्यानीच घडवून आणिली.

ही भेट कशी घडून आली व प्रथम भेटीतच बाबांचे व त्यांचें काय बोलणे आले ही समग्र हकिगत साईलीलेच्या आक्टोबर ( १९६२ ) अंकांत देण्यांत आली आहे. तसेंच श्रीदासगणू हे साक्षात्कारी पुरुष होते काय? याचे विवरण नोवेंबर अंकात करण्यांत आलें आहे. डिसेंबर म्हणजे गेल्या महिन्याच्या अंकांत बाबानी दासगणूंना नोकरी सोडण्याचा आग्रह कसकसा केला परंतु त्या मोहांतून निसटणें त्यांना कसकसें कठीण होत होतें व शेवटी ११२ प्रसंगांत सांपडले असतां बाबांच्या कृपेने त्यांची कशी सुटका झाली व शेवटी बढती मिळण्याची वेळ आली असतांही त्यानीं नोकरीच्या पाशांतून आपली कशी सुटका करून घेतली तसेंच बाबांच्या प्रेरणेनें कविचरित्र लेखनास त्यांनीं कसा आरंभ केला ही सारी हकिगत देण्यांत आली आहे.

### मस्तकावर बाबांचा वरदहस्त

श्रीदासगणू महाराज यांचे सारे चरित्र अद्‌भुतरम्य प्रसंगांनी कसें ओतप्रोत भरले आहे याची वाचकांस कल्पना आली असेलच. त्यांनी आधुनिक काळांतील महाराष्ट्रांतील किती तरी संतांचें जीवनकार्य प्रकाशांत आणिले. शिक्षण बेताचेच झालेलें; परंतु त्यांच्या मस्तकावर साईबाबाचा वरदहस्त होता; मग आणखी काय पाहिजे? त्यांची पोवाड्यात व लावण्यांत गुंतलेली काव्यप्रतिभा संतचरित्रकथनाकडे वळली व एकाहून एक सरस अशी असंख्य संत्र चरित्रें ती प्रसवली. आणि त्यामुळें आधुनिक 'महिपती' या थोर पदवीस श्रीदासगणू हे समर्थ ठरले.

श्रीदासगणूनी आपल्या गुरुजीची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनी सोपविलेले कार्य उत्तमपणे पार पाडिलें. एवढेच नव्हे तर कीर्तनाच्यारूपानें साईबाबांचा परिचय महाराष्ट्रातील आबालवृद्धास करून दिली. तत्पूर्वी साईबाबांची सत्पुरुष या नात्यानें ज्यांना ओळख झाली होती अशी काही निवडक मंडळीच होती; परंतु आज घराघरातून साई भक्तीची ज्योत पेटलेली आपणास दिसत आहे; घराघरातून, दुकानांतून, मंदिरातून जिकडे पहावे तिकडे साईबाबांच्या प्रतिमा आपणास दिसत आहेत. याची यशस्वी मुहूर्तमेढ जर प्रथम कोणी रोविली असेल तर ती म्हणजे ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यानीच होय.

श्रीदासगणू महाराजानी आपल्या रसाळ वाणीनें श्रीसाईबाबांची कीर्तने ठिकठिकाणीं करून ह्या संतश्रेष्ठाचा परिचय लोकांस करून दिला. त्यावेळी बोरिवलीस

श्रीसाईंचे परमभक्त ठाण्याच्या कलेक्टरचे चिटणीस कै. श्री. ना. गो. चांदोरकर हे जमीनविषयक कामासाठीं कै. श्री. सुं. दी. नवलकर ह्याच्या घरी येत असत. त्यावेळीं श्री. चांदोरकरांनी आग्रहानें श्रीदासगणूचे कीर्तन श्री. नवलकराच्या घरी पहिल्यानें करविले व तेव्हापासून श्रीसाईमहाराज मुंबईत सर्वांस ज्ञात झाले. त्याच्यानतर श्रीदासगणूंची मध्य भारतापर्यंत-इंदूर, ग्वाल्हेर, बडोदे वगैरे संस्थानात कीर्तनें होऊ लागली व कीर्तनांचेद्वारा ते ह्या सर्वश्रेष्ठ संतांच्या लीला लोकांना सांगू लागले.

**ह्या नखरा कशासाठी ?**

शिरडीस राहात असताना एकदा रामनवमीच्या उत्सवासाठी म्हणून कीर्तनास जाण्याचा प्रसंग आला. कीर्तनकाराच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणे झिरमिळ्याची सुरेख पगडी, करवतकाठी उपरणें आणि डेरेदार पांढराशुभ्र अंगरखा असा पोशाख करून श्रीदासगणू कीर्तनास निघाले. जाताना नमस्कार करण्यासाठीं श्रीसाईबाबांचेकडे गेले असताना बाबानी विचारलें, "कुठे निघालास रे गणू ?"

"कीर्तन करण्यास जातो बाबा."

"असा नवऱ्यामुलासारखा नटून ? अरे, परमार्थाकरतां कीर्तन ना ! संसारांत अलिप्त रहावें, हे सांगणार ना तुम्ही ? मग हा थाटमाट आणि नखरा कशासाठी ? काढ, काढ तें सगळें."

बाबानी दासगणूच्या अंगावरील अंगरखा, पगडी काढून घेतली. उपरणे तेवढें अंगावर घ्यावयास दिले आणि म्हणाले, "जा. आजपासून असेच करीत जा कीर्तन."

तेव्हांपासून श्रीदासगणूमहाराज उघड्या अंगाने अंगावर एक उपरणें तेवढें घेऊन कीर्तन करूं लागले. मोठमोठ्या संस्थानिकाच्या दरबारांतून केलेली कीर्तनें त्यानी अशीच उघड्या अंगाने केली. दरबारी शिस्तीकरतां आपली पद्धति सोडली नाही. राजे लोकानींहि महाराजाना त्या बाबतीत छेडलें नाहीं. कारण 'निःस्पृहस्य तृणं जगत्' या नियमाशीं ते अपरिचित नव्हते. नारदाच्या गादीला शोभण्यासारखीच ही विरागी वेषभूषा आहे आणि दासगणूंच्या कीर्तनप्रसंगीच्या एकंदर रंगाशी ती सुसंगतहि आहे. कीर्तनामध्ये जें मनांत तेच बाहेर. मधे आडपडदा म्हणून कशाचा नाही. बोलणें स्पष्ट एक घाव दोन तुकडे अशा स्वरूपाचें आणि लपवाछपवीचे म्हणून काहीच नाही. मग अंगरखा पागोट्याचा हा डामडौल कशाला ? कीर्तनाला उभे राहण्याची त्यांची पद्धतहि निष्ठावंत भावाची द्योतक आहे. भाव स्थिर हवा. स्थिरपणा, निस्पृहपणा आणि वैराग्य हीच परमार्थाची मुख्य लक्षणे. त्या दृष्टीनें कीर्तनाची ही पद्धति अत्यंत उचित अशी वाटते.

**मराठवाड्यांत आगमन :**

'नांदेडास जा' असें सांगितले असल्याने आणि संतचरित्रे

आज्ञेप्रमाणें पतकरलेलें काम करावयाचें असल्यानें श्रीदासगणू महाराज हे या काळांत मुख्यतः शिरडीस राहात असले तरी मधून मधून कांही दिवस मराठवाड्यांत जाऊन येत असत. या दोन चार वर्षांच्या काळांत मराठवाड्यांतील सर्व भाग व कांही तैलंगणी मुलूख त्यानीं आपल्या पायाखालीं घातला. त्यांचे पूर्वायुष्यांतील शिक्षक, पण आतां मित्र बनलेले श्री. बळवंतराव खेडकर या नांवाचे एक गृहस्थ नांदेडास राहात असत. हे गृहस्थ मोठे साक्षेपी होते. त्यांच्या चौकसपणाचा फायदा श्रीदासगणू महाराजांना बराच झाला. काही सतचरित्रविषयक माहिती बळवतरावानीं श्रीदासगणूना वेळोवेळी आपल्या ग्रथातून त्यांचा तसा उल्लेखहि केला आहे. 'संतकथामृत' च्या त्रेपन्नाव्या अध्यायात—

"हे शहासाहेब चरित्रामृत । पाजिले मजशी नांदेडात ।
माझ्या विद्यागुरूने सत्य । बळवंतराव खेडकरे ॥" १०१

असा त्याचा उल्लेख केला आहे. आरंभी महाराजाचा मुक्काम नांदेडास या खेडकरांकडेच असे. या काळांत ते कीर्तनेंहि करीत. गाण्याचें अंगही फारसे नव्हते. साथीदार कोणीहि नसे. आवाज मोठा असला तरी किंचित् घोगरा असे; पण महाराजाचा ताल पक्का. आवाजाला एक तऱ्हेचा जिव्हाळा आणि अंतरीच्या निष्ठेमुळे बोलण्याला एकप्रकारची गोडी प्राप्त झालेली. त्यामुळे त्याची कीर्तनें या वेळींहि लोकप्रियच होती. याशिवाय आख्यानातील संविधानकाची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी आणि काव्यरचनेंतील नावीन्य यांचेंहि फार आकर्षण असे. या कारणाने एकट्यानें कीर्तन करीत असूनहि कीर्तन-रंगांत तशी उणीव पडली नाही. त्याच्या आख्यानाचे वैशिष्ट्यच असें आहे कीं, जरा बरें बोलता येणारा कोणीहि कीतनकार गाण्याचे अंग नसूनहि या आख्यानांच्या आधारें कीर्तनरगांत रसाळपणा आणूं शकतो. कीर्तनाची बिदागी काहीहि घ्यावयाची नाहीं, असा नियम असल्याने तोहि कीर्तनकाराविषयीचा लोकांच्या मनांतील आदर वाढविण्यास कारणीभूत होत असे. श्रीदासगणू महाराजांची ओळख या कारणानें या मराठवाडा प्रातांत पुष्कळच होऊ लागली. त्याच्याविषयींचा सद्भाव लोकाच्या मनांत वाढूं लागला आणि श्री. पुडलिकराव नांदेडकर वकील यांच्यासारख्या सद्गृहस्थांनीं त्यांचे शिष्यत्वहि पतकरलें.

**निःस्पृहता :**

कीर्तनाची बिदागी न घेण्याचें हे व्रत ते किती निष्ठेनें पाळीत, तें इंदुरास घडलेल्या एका प्रसंगावरून सहज ध्यानीं येण्यासारखे आहे. इदूर येथील श्री. रघुनाथ बळवंत आळेकर या सद्गृहस्थानी स्वतः अनुभवलेला तो प्रसग त्यांच्याच शब्दांत पुढे देण्यात येत आहे.

"शके १८४७ मध्यें श्रावणमास कीर्तनासाठीं श्रीमंत सरकार सवाई तुकोजीराव होळकर यांजकडून ह. भ. प. दासगणू महाराजांना बोलाविलें होतें. महिनाभर

'यशवतनिवास' राजवाड्यांत कीर्तन होत असे. गुरुभक्तिपरायण श्री. दामूअण्णा कैलासवासी झालेले असल्यामुळे व कै. किसनराव यास इदुरास येण्यास विलंब असल्यानें महाराजाचे कीर्तनास मार्गे साथ करण्याचें सौभाग्य प्रथमच प्राप्त झाल्यामुळे प्रत्यक्ष पाहिलेली हकीगत पुढे देत आहोत.

## मोहरांनी भरलेले ताट

कीर्तनाची वेळ दुपारी चार ते सहापर्यंत असे. कीर्तनश्रवणास महाराजासाहेबाच्या मातोश्री, दोघी महाराणीसाहेब आणि प्रसगी युवराज यशवंतराव होळकर व राजकन्याहि असत. याशिवाय काही मानकरी मडळी निमंत्रित असत. महाराजाचे भक्तिरसाने ओथंबलेले कीर्तन ऐकताना स्वतः महाराजाचे व इतर श्रोत्याचे डोळे प्रेमाश्रूनें डबडबलेले दृष्टीस पडत. श्रावण महिनाभर याप्रमाणे कीर्तन झाल्यावर शेवटी समाप्तीचे कीर्तनाचा दिवस उगवला. श्रीदासगणू महाराजाचा निस्पृहपणा व कीर्तनाबद्दल काही न घेण्याचा नियम सर्वश्रुत होताच. राजवाड्यात तर बिदागीची तयारी सुरू होती. तेथील काही प्रतिष्ठित मडळी ज्याचा सबध राजघराण्याशी होता, महाराजासाहेबाचे स्वभावाशीं जे पूर्ण परिचित होते व जे श्रीदासगणू महाराजाचे भक्त होते, त्यानी येऊन सागितले की, 'आपणांस काही बिदागी जर श्रीमतानी दिली, तर आपण तिचा अव्हेर करू नये. कारण तसे केल्याने श्रीमतास राग येण्याचा पूर्ण संभव आहे.' यावर महाराजांनी त्या सर्वांचे समाधान केलें व आश्वासिले कीं, 'तुमच्या राजाचा अपमान न होऊ देतां माझा नियम पाळण्याची खबरदारी घेतली जाईल.' कीर्तनाची वेळ झाली. समाप्तीचा दिवस असल्याने इतर बरीच बडी बडी मडळी आमंत्रित होती. बिदागीदाखल एका सोन्याच्या थाळीत सोन्याच्या मोहरा व चादीचे ताटात रुपये भरून देवापुढे ठेविले होते. शुभचिंतक लोकाचें मनात आजचा प्रसंग कसा निभावतो, याबद्दल एक प्रकारची धास्ती व कुतूहल होतें. आख्यान सपले. समारोप सुरू झाला. समारोपादाखल श्रीदासगणूमहाराजानीं जें भाषण केलें, त्यामुळें श्रीमत होळकर सरकार व इतर श्रोते तर थक्क झालेच. पण वाचकवर्गहि ते भाषण वाचून मत्रमुग्ध झाल्याशिवाय राहणार नाही.

## महाराजांची समयसूचकता

श्रीदासगणू महाराज म्हणाले, "श्रीमंत होळकर सरकाराचा असा लौकिक प्रसिद्ध आहे कीं कोणी विद्यार्थी नवीन विद्या शिकण्याच्या इच्छेनें श्रीमंताकडे मदत मागण्यास गेला, तर श्रीमंताची विद्याप्रियता त्यास शिष्यवृत्ति देण्यास भाग पाडते. असे अनेक विद्यार्थी श्रीमंतांचे साहाय्यानें विद्या संपादन करून मोठेपणास प्राप्त झाले आहेत. मीहि एक विद्यार्थी आहे आणि श्रीमताचेकडे शिष्यवृत्ति मागणार आहें. माझी खात्री आहे कीं, श्रीमंत उदार अंतःकरणानें मला ती देतील." हें वाक्य ऐकतांच सर्वांचे मनांत विचारांचें काहूर माजलें. कोणास वाटलें की, महाराराज कांहीं तरी

निराळे का होईना पण मागणार व घेणार. कोणास वाटलें की, बिदागी पाहून मोह सुटलाच. इत्यादि इत्यादि. पण हें विचाराचें वादळ श्रीदासगणू महाराजाच्या पुढील वाक्याने एका क्षणात पार मावळले. श्रीमहाराज म्हणाले, "मी परमार्थ कॉलेजांत प्रवेश चाहतो आहे. या कॉलेजात निर्लोभतेची शिष्यवृत्ति लागते. ती श्रीमंतानी मला देऊन आपला नांवलौकिक राखावा. हीच माझी श्रीमंताकडे नम्र मागणी आहे."

झालें. कीर्तन संपले. आरती झाली. खिरापत वाटली गेली. बिदागीची तारें जशीं बाहेर आली, तशी आत गेलीं. श्रीमंतासह सर्व श्रोते जणु मंत्रमुग्ध झाले होते. सर्वांच्या अंतःकरणात श्रीदासगणू महाराजाविषयीं एक आदराचीच भावना भरून राहिली होती. काहींना ती बोलून दाखविल्याविना राहवे ना. "मी मी म्हणविणाराना मोह पाडणारी विपुल संपत्ति समोर आली असतांना तिचा लोभ मनास न शिवूं देता अत्यंत सौजन्याने व निगर्वीपणानें संपत्तीला नाकारण्याचे अद्वितीय उदाहरण आज प्रथमच दृष्टीस पडलें." असे ते म्हणाले.

## दुसरा एक प्रसंग

आणखी एक असाच प्रसंग या वेळींच घडला आहे. देवास मोठ्या पातीचे राजे श्रीमंत तुकोजीराव पवार हे कृष्णभक्त असत. जन्माष्टमीचा उत्सव ते मोठ्या प्रमाणात करीत. सात दिवस नामसप्ताह असे. राजेसाहेब रात्रीं दोन तास उभे राहून नामसप्ताहांत पहारा करीत.

याच वर्षी म्हणजे शके १८४७ मध्ये श्रीदासगणू महाराज इंदूर मुक्कामी असताना एक दिवस तरी कीर्तनास येण्यासाठी देवासचे आग्रहाचे आमंत्रण आलें रात्रीं कीर्तन झालें. कीर्तन अवर्णनीय प्रेमरसानें ओथंबलेले असल्यानें सर्वांस विशेषिकरून राजेसाहेबास फारच आवडलें. दुसरे दिवशी सकाळी निघतांना राजेसाहेबानी चांदीचे तबकात एकशें एक रुपये भरून श्रीदासगणू महाराजांस दिले. कीर्तनाबद्दल काही न घेण्याचा नियम महाराजानी श्रीमंतास सांगितला. त्यावर राजेसाहेब म्हणाले, 'हा गोपाळकृष्णाचा प्रसाद आहे. आपण याचा अव्हेर करूं नये.' हें ऐकताच महाराजानी ती रक्कम उचलली व तेथे जी ब्राह्मणमंडळी जमली होती, त्यास वाटण्यास आरंभ केला. कोणी घेईनात. तेव्हा श्रीदासगणू महाराज म्हणाले, "गोपाळकृष्णाच्या प्रसादाला कोणी नाही म्हणू नये." राजेसाहेबास काही बोलता येईना. कारण ते त्यांच्याच शब्दात पकडले गेले होते. श्रीदासगणूमहाराजाच्या निस्पृहतेचे सर्वांनाच फार आश्चर्य वाटलें.

## संतचरित्राचें लेखन :

संतचरित्राची माहिती गोळा करीत असताना श्रीदासगणू महाराज हे गांवोगांव प्रवास करीत, हे वर लिहिलेंच आहे. त्यावेळी त्यांची पद्धति पुढीलप्रमाणें असे. प्रातर्विधी उरकून तास दीड तास स्नानसंध्या व इतर जपजाप्य यांत घालवावा. मग गावातील निरनिराळ्या थरातील लोकांच्या प्रत्यक्ष जाऊन गांठीभेटी घ्याव्या. त्यांना या गावामध्यें कोणी संत, सत्पुरुष होऊन गेले की काय, याची माहिती विचारावी. त्या

संताचे कोणी वशज, वारस वा मठाधिपति असल्यास त्याची भेट घ्यावी. पाहावयास मिळतील तेवढे सर्व कागदपत्र काळजीपूर्वक पाहून नोद करावी. त्या संताविषयी पूर्वी होऊन गेलेलें वा त्यानें स्वतः रचलेले काही वाङ्मय असल्यास त्याचे अवलोकन करावे आणि देश, काल, परिस्थिति या सर्वांचा विचार सतत डोळ्यापुढे ठेऊन सतचरित्र ओवीबद्ध करावे. या कारणामुळे श्रीदासगणू महाराजानी लिहिलेल्या चरित्राना एक प्रकारची ऐतिहासिक प्रतिष्ठाहि लाभलेली आहे. श्रीदासगणू महाराजाच्या या लिखाणाचा जुन्या पिढीतील काही विद्वान सशोधकानी अधिकृत म्हणून आधार घेतला आहे. महाराष्ट्र सारस्वतकार श्री. विनायकराव भावे, महाराष्ट्रभूषण श्री. आजगावकर, ह. भ. प. पागारकर इत्यादीनी आपापल्या ग्रथातून निरनिराळ्या सताचे वर्णन करीत असताना श्रीमहाराजाच्या ग्रथाचे आधार काही ठिकाणी घेतलेले आढळतात. महिपतीशी तुलना करताना साहित्यसम्राट न. चि. केळकर यानी लोकव्यवहाराचें ज्ञान व चतुरस्रपणा हे गुण श्रीदासगणूच्या काव्यात अधिक आहेत, असे उल्लेखिलें तें यामुळेच. हा सर्व प्रवास करीत असताना दासगणूना बराच त्रास सहन करावा लागे. जेथें कोठें ओळख असे, तेथे ठीक. पण ओळख नसलेल्या गावी फार कष्ट होत. निवाराहि धड न मिळाल्याने जवळील सामानसुमान, पैसेअडके चोरीस जात आणि त्यामुळे अत्यत अडचण उत्पन्न होई. अशा रीतीच्या नुकसानीची त्यानी एकदा ईश्वराकडेच आगळीक केली आहे.

**ओवी**

> “ संतचरित्रे मिळविण्याशीं । मी आलो अति हर्षी ।
> नुकसान माझे व्योमकेशी । मध्यंतरी का केले ? ।
> तुझ्यावरी ही मोडकी काठी । आली असे की जगजेठी ।
> द्रव्य माझे उठाउठी । नेले असे तस्कराने ।
> तुझ्या मनी येईल जैसे । तैसें तैसे घडतसे ।
> माझी लाज तुला असे । नको उपेक्षा माझी करूं ॥ ”

भक्तलीलामृत ४१

**प्रवासांत खडतर अनुभव**

जवळ पैसाअडका अगदी बेताचा, त्याचीहि अशी वाट लागली म्हणजे कसा प्रसग ओढवत असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. स्वयंपाक वगैरे ते बहुधा हातानेच बनवीत. भाजी मिळाली तर ठीक, नाही तर नुसते भातपीठले उकडून खावें, अशी पद्धत असे वेष अगदीं साधा. अगामध्यें बडी, डोक्यास पाढरा रुमाल, अगावर साधे उपरणें, जरा आखुडच असें नेसलेलें धोतर आणि खांद्यावर पडशी. यामुळे एकादा पाथस्थ भिक्षुक समजून क्वचित् ठिकाणी अवहेलनाहि होई. निवाऱ्यास जागा वा स्वयपाकास भाडीहि मिळत नसत. भुसावळ येथे घडलेली गोष्ट सागण्यासारखी आहे. शहरामध्यें ओळख कोणाचीच नव्हती. मंदिरेंहि त्या दृष्टीने पाथस्थाच्या हक्कान्नीं

निवासस्थानें समजली गेली पाहिजेत. पण मंदिराच्या चालकाना मंदिर हे स्वतःचेंच घर वाटतें, असा तेथे अनुभव आला.

एका राममदिरामध्यें श्रीदासगणू महाराज जाऊन उतरले. बरोबर दोन माणसेंहि होतीं. जागा मोठ्या मिनतवारीनें पडवीच्या एका कोपऱ्यात मिळाली, परंतु इतर कोणतीहि मदत करण्यास मदिराची व्यवस्थापकबाई मुळीच तयार होईना, उलट सामान्य माणुसकीलाहि न शोभणारा तुसडेपणा तिने दाखविला. श्रीदासगणू महाराजाना या गोष्टीचें फार दु:ख झालें. जी मंदिरें आल्यागेल्या अतिथिअभ्यागताची विश्रांतिस्थाने व्हावयाची, अडल्यापडल्यावेळीं मदत करणे हें ज्याचे कर्तव्य, त्याकरिताच केवळ भारतीय सस्कृतीमध्यें या मंदिराचे महत्त्व. त्याचीच एक व्यवस्थापिका या रीतीचे वर्तन करते, याचा त्याना मोठा खेद वाटला. त्यानी जवळील होते ते सर्व पैसे खर्च करून बाजारातून पंचवीस तीस रुपयाचीं नवी भाडीं आणली आणि ती त्या व्यवस्थापक बाईच्या स्वाधीन करून नमस्कारपूर्वक विनविलें कीं, "बाई, यापुढें तरी कोणाला अडल्या वेळी नाही म्हणून झिडकारूं नका. रामराय तुम्हाला सद्बुद्धि देवो." हे पाहून मग बाईना फार लाजल्यासारखे वाटलें.

**साईबाबांची आज्ञा**

अशा रीतीचे अनुभव अगदीच थोडे येत, असें नाही; परतु महाराजांनी आपलं व्रत कधीं सोडलें नाहीं. साईबाबांची आज्ञा त्याना प्राणापलिकडे प्रिय होती आणि त्यासाठीं वाटेल तें करण्याची त्यांच्या मनाची सिद्धता असे. पुढे पुढें अर्थातच ही परिस्थिति पार पालटली. लोक श्रीदासगणू महाराजाना मुद्दाम आदरानें बोलावून आपल्या गावीं नेऊं लागले. शेगाव येथील प्रसिद्ध सत्पुरुष श्रीगजानन महाराज याच्या चरित्रलेखनप्रसंगी या गोष्टीचा चांगला अनुभव आला. श्रीगजानन महाराज संस्थानचे मुख्य व्यवस्थापक श्री. रामचद्र कृष्णाजी पाटील हे श्रीगजानन महाराजाचे ओवीबद्ध चरित्र लिहवून घेण्यासाठीं श्रीदासगणूना शेगावास नेण्याच्या उद्देशानें पंढरपुरास आलें. मोठ्या आग्रहानें व प्रेमाने शेगांवास चलण्याची विनंति केली. अगदी धरणे धरले. त्या वेळीं १९३९ साली श्रीदासगणू महाराज शेगांवास प्रथम गेले. शेगांवकर मंडळीनी स्टेशनवर फारच मोठे स्वागत केलें. शेंकडो लोक स्वागताकरितां उभे होते. एक उत्तम रथ श्रृंगारून तयार केला होता आणि त्यांतून महाराजाना समारंभानें मिरवीत नेण्याची त्यांची इच्छा होती. महाराजांनी ती गोष्ट मान्य केली नाहीं, ते निराळें. परतु केलेल्या तपश्चर्येला व्यावहारिकरीत्या का होईना पण कसें आदराचें स्वरूप प्राप्त होते, याचे प्रतीक म्हणून पुढें घडलेली ही गोष्ट प्रकरणानुरोधाने मी येथेच सांगितली.

**महार मामलेदाराची कृतज्ञता**

अडचणींत सापडलेल्या माणसाला मदत न करणें हें पातक आहे असें महाराज मानतात, त्यामुळें अडीअडचणींत असलेल्या माणसांना आपणांकडून होईल ती मदत करणें, हा श्रीदासगणू महाराजांचा एक स्वभावविशेष होता. मनमाडच्या

स्टेशनवर नांदेडकडे जाणाऱ्या गाडीची वाट पाहात बरोबरची मंडळी बसली होती. महाराज फर्स्टक्लास वेटिंग रूमच्या बाहेर बाकावर बसले होते. इंग्रजी वेशभूषा केलेले एक गृहस्थ महाराजांच्याकडे न्याहाळून निरखून पाहात व पुन्हा वेटिंग रूममध्ये जात. काही तरी निमित्ताने बाहेर येऊन त्यानी दोन तीनदा याप्रमाणें केलें. शेवटी ओळख पटली वाटते. त्यानी लाबूनच पण अगदी वाकून नम्रपणे नमस्कार केला व विचारले, "मला ओळखलेंत का महाराज ? दहा बारा वर्षापूर्वी कीर्तन संपल्यानतर ज्याला आपण पन्नास रुपयाची मदत केली तो मी. मी आता मामलेदार झालो आहे. आपल्याच कृपेमुळें हा योग आला."

वस्तुस्थिति अशी होती की, जातीने महार असलेला एक विद्यार्थी परीक्षेची फी भरण्याच्या अडचणीत होता. अनेक ठिकाणी प्रयत्न करूनहि त्यास मदत मिळाली नाही. शेवटी कीर्तनास निघालेल्या श्रीदासगणूंना त्याने दारातच अडवून काही मदत देण्याविषयी विनति केली. ती मान्य करून महाराजानी कीर्तनामध्यें जमलेली आरती त्यास नंतर देऊन टाकली. हाच गृहस्थ पुढे मनमाडच्या स्टेशनवर भेटला. महाराजानाहि त्याची ओळख पटली. मोठ्या प्रेमाने त्याना त्यास जवळ बसवून घेतले. गृहस्थ संकोचत होता. तेव्हां महाराज म्हणाले, "अरे, मी प्रवासात आहे. आगगाडीतून जातांना किती सोवळे पाळणार ! सकोचूं नको." मुलाबाळासबधीं आस्थेने विचारपूस करून त्यानी मामलेदारास निरोप दिला. कृतज्ञतापूर्वक नमस्कार करून ते गृहस्थहि त्यांच्या गाडीचा वेळ झाल्यामुळें निघून गेले.

**एक करुण दृश्य**

मोंगलाईत प्रवास करतांना एका खेडेगांवी मुक्काम होता. त्या वेळी त्या भागात कॉलऱ्याची तुरळक साथ होती. एका झोपडीमध्ये एका मराठा शेतकऱ्याचें जोडपे साथींत सांपडून मरून पडले होते. बहिर्दिशेहून परत येत असताना महाराजानी तो प्रकार पाहिला. पाच सहा वर्षाचा एक लहान पोर प्रेताच्या अंगावर पडून 'आई ऊठ, बोल ग' असा आक्रोश करतांना त्यानी पाहिला. श्रीदासगणू महाराज जवळ गेले व त्यानी त्या मुलीस विचारलें, 'काय झाल ग बाळ ?'

'माझी आई कवाची निजली हाय मामा, हलविली तरी बोलतच नाय.' महाराजाना कीव आली. त्यांनी त्या मुलीला जवळ घेऊन कुरवाळले. ते दीन लेकरूहि मामा म्हणून त्यांना बिलगलें. महाराजानी आपल्या मंडळीकरवी त्या अनाथ प्रेताची व्यवस्था लावली. जनाबाईच्या आख्यानातील जनीच्या आईवडिलांच्या मृत्यूचा हृदय-द्रावक प्रसंग वर्णितांना महाराजाच्या डोळ्यापुढें या पोरीच्या आईबापाचा मृत्यु असावा असें वाटतें. मुक्काम हालतांना मुलगी मागे राहीना. रडूं लागली. तिला महाराजाचा लळा लागला होता. अर्थात् तिला बरोबर घेणें महाराजाना भाग झालें. पांच सहा महिने ती पोर—ताई तिचें नांव—महाराजाच्याबरोबरच होती. पुढे नांदेड-जवळील एका खेड्यातील पाटलाला महाराजानी त्या मुलीचा सभाळ करण्यास सांगितले. पाटलास मूल नव्हते. म्हणून तो महाराजांना आपल्या गावीं आग्रहानें घेऊन गेला होता. पुढें योगायोगानें त्या पाटलास मुलगा झाला. महाराजांची कृपा म्हणून ही चांगल्या पायगुणाची मुलगी आपल्या घरी आली, असें पाटलास

वाटले. त्यामुळे त्या अनाथ मुलीचा—ताईंचा—त्याने प्रेमाने प्रतिपाळ करून पुढे तिचे लग्नकार्यंहि करून दिलें.

सिद्धार्थ कॉलेजात सायन्सचे प्रमुख प्राध्यापक असलेले श्री. गोविंद रामचंद्र गोगटे D. Sc. हेही महाराजांच्याविषयी कृतज्ञ आहेत. महाराजाचें श्री. गोगटे याच्यावर फार प्रेम होतें. भेट झाली म्हणजे तासन्तास ते एकमेकांशी जिव्हाळ्यानें बोलत असत. श्री. गोविंदरावांची मूळची घरची अगदी गरिबी होती. वडील लहानपणीच निवर्तलेले व आजोबा शाळेंत शिक्षक. कॉलेजमधील शिक्षण श्री. गोविंदरावांना आपल्या हुशारीवर व अभ्यासूपणावर फ्रीशिप्स मिळवून पुरें करावे लागले. त्याच्या अडचणीच्या वेळी श्रीदासगणू महाराजांनी त्याना अनेक प्रकारें हस्तें परहस्ते साहाय्य केलें व करविलें. श्रीगोविंदरावांच्या ठिकाणी यामुळेच महाराजांच्याविषयीं विशेष प्रेमादर असे. उत्सवविशेषी आपणांसहि कांही सेवा लाभावी, अशी त्याची उत्कट इच्छा असे व ती पूर्णहि होत असे.

कदाचित् कुरुदवाडास भेटलेल्या रक्तपिती सज्जनामुळे असेल, पण श्रीदासगणू महाराजांच्या परोपकारी स्वभावाला एखाद्या व्रताचें वा निष्ठेचें स्वरूप आलेले होते असे दिसते.


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बलवान बना:**—यासाठी लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डें, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रे, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठी लिहा: ..



# पहिलें वंदन देवाला

—स्वामी शिवानंद

**आजकाल आपण देवाला, धर्माला व जगालाही विसरून गेलों आहोंत. जेथें तेथें मी आणि मी. जेथें तेथें स्वार्थ. त्यामुळें आम्हीं दुःखाच्या खाईत लोटले गेलेले आहोंत. मग शाश्वत सुखासाठीं करावयाचें काय?**

पहिलें स्थान देवाला, दुसरें जगाला व तिसरें स्वतःला-या क्रमानें आपण वागलें पाहिजे; परंतु तसें आमच्याकडून घडतें आहे का? नाहीं. आणि त्यामुळेंच आम्हीं आमच्यावर नाना संकट परंपरा व दुःख परंपरा ओढवून घेत असतों. हा जो क्रम सांगितला त्याला आम्हीं साफ विसरून गेलों आहोंत आणि त्यामुळें पुन्हां पुन्हा संकटाच्या खाईत दडपले जात आहोंत!

## विसर कां पडतो?

बरें; एवढें हें महत्वाचें तत्त्व असता माणसाला त्याचा कां बरें विसर पडतो? याला कारण त्याचा स्वार्थी स्वभाव. स्वार्थामुळें तो स्वतःकडे अग्रपूजेचा, पहिल्या क्रमांकाचा मान ओढून घेतो. जगाला दुसरा व देवाला तिसरा क्रमांक देऊन मोकळा होतो. तेव्हा मूलतः पाप घडतें तें स्वार्थापायीं. त्यामुळें तो संसार चक्राला बांधला जातो आणि गिरीगिरी चक्राकार फिरत रहातो!

बरें हा स्वार्थ तरी येतो कुठून? आपल्या अज्ञानांतून त्याचा जन्म होतो.

कर्ता करविता, आमच्या बऱ्या वाईट कृत्यांचा साक्षीदार जो भगवंत तो तर अंतर्यामी वास करीत आहे. इतका जवळ असून अज्ञानापायीं त्याचा आम्हांला विसर पडला आहे.

या अज्ञानामुळें आमच्या दृष्टीवर झांपड येते. त्यामुळें राग-द्वेषादि भावना बळावतात, फोफावतात. भीतीनें आपण गांगरून जातो. वरच्या पातळीवर जायचें ते आम्हीं एकदम खालच्या पायरीवर आदळले जातो!

## सतत फिरणारें दुष्ट चक्र

अज्ञानामुळें स्वार्थ बळावतो; स्वार्थामुळें नाना प्रकारच्या इच्छा डोकें वर करूं लागतात. त्या इच्छा पूर्ण करून घेण्यासाठीं स्वार्थी व दुष्ट प्रकारची वागणूक करावी

लागते व अशारीतीनें हें चक्र एकसारखे फिरत रहातें व त्याला आपण घाण्याच्या बैलाप्रमाणें जुंपले जातो. मग जन्म आणि मरण हें रहाटगाडगें सुरू रहाते.

तुमचा खरा शत्रू कोण ? तुमच्या अंतःकरणांत दबा धरून बसलेलें अज्ञान ! त्याचा नाश करण्याचा निर्धार करा. या शत्रूनें आपलें घर कुठें वसविलें आहे माहीत आहे ? मनांत ! मनुष्य बाह्य गोष्टींवर, जमिनीवर व आकाशावर विजय मिळवूं पहात आहे व तो विजय मिळवीतही आहे; परंतु तो खरा विजय नव्हेच मुळीं ! तुमच्या मनावर, देह आकाशावर तुम्हांला विजय मिळवावयाचा आहे. तो जोपर्यंत तुम्ही मिळवू शकलां नाहीं तोपर्यंत तुमचे सारे विजय फुकट आहेत. खरा व महान् योद्धा कोण ? पुष्कळ मुलूख पादाक्रांत करील तो कां ? नाही. जो आपल्या मनावर संपूर्ण विजय मिळवील, त्याच्यावर हुकमत चालवूं शकेल तोच खरा व महान् योद्धा होय. सारें जग जिंकलें आणि स्वतःचें मन जिंकलें नाही, तें सैरावैरा धांवपळ करीत राहिलें तर त्या विजयाचा तुम्हांला काय बरें उपयोग ?

## मनाला वेसण घाला

आम्हांला स्वानुभूतीचा लाभ होत नाही, आम्हांला सुख समाधान व शांतता लाभत नाहीं याला कारण ? मनाचा ओढाळपणा. त्याला आपण वेसण घालूं शकलो नाहीं हेंच होय.

आज आम्ही ज्या स्थितींत आहोंत व ज्या विचारांत वावरत आहोंत, याचें कारण आम्ही त्याच दृष्टीनें व त्याच मार्गानें विचार करीत गेलों. जसे आमचे विचार तसे आम्हीं बनतो, नाहीं का ? पुढें आम्हीं कोण होणार, काय करणार हें आजच्या आमच्या विचार संपदेवर अवलंबून राहील. तेव्हां योग्य व कल्याणदायी विचार-सरणीची कांस आपण धरूं या वायफळ व दुःखाच्या खाईत लोटणाऱ्या विचारांस आजच्या आज मूठमाती देऊं या.

अंतःकरणांत पवित्र विचारांचा झरा सतत वहात रहाणें हें एक जबरदस्त सामर्थ्य आहे, तें आपण संपादन करूं या. साधूसंतांकडे जरा नजर फेका. त्यांच्या हातून सत्कृत्यें घडतात कारण त्यांच्याठायी सुविचार, सद्भावना जाग्या झालेल्या असतात. त्याच प्रकाशांत ते वावरत असतात. तसे वावरण्याचा व तशा प्रकारची पवित्र विचारांची संपदा जवळ करण्याचा आपण कसून प्रयत्न करू या.

मनाचा गुलाम होऊन रहाणें हें अज्ञान व मनावर तावा मिळविणे हा शहाण-पण तेव्हां तुम्हांला सुख, समाधान व शांति यांचा लाभ करून घ्यायचा असल्यास मन जिंका; मन जिंका.

## मन जिंकायचें कसें ?

मनाला जिंकावयाचें कसें? कोणत्या हत्याराच्या सहाय्यानें? शहाणपणाच्या तरवारीनें. सारासार दृष्टी संपादन करा. हितकर कोणतें व अहितकर कोणतें हें समजून घ्या. हितकर असेल त्याचेंच आचरण करावयाचें असा निर्धार करा. तो रोज कटाक्षपूर्वक अंमलांत आणा. मनाला एका बाजूला काढून अंतर्गत शत्रूशीं निकराचा सामना द्या. मनाला वळण लावा. मन निर्विकार करा. शिस्तीनें त्याला ताब्यांत आणा. सद्विचार, सद्भावना याशिवाय मनात दुसरें काहीं येऊं देऊं नका. अशा रीतीने मनांतील मळ धुतला जाईल,

काय मौज आहे पहा! या मनांत चार प्रकारचे अग्नी पेटत असतात! भोगेच्छा, द्वेषभावना, राग व मत्सर. एकाहून एक भयंकर असे हे अग्नी आहेत. माणसाला जाळून त्याचें भस्म करून टाकणारे हे अग्नी आहेत. ते विझवावयाचे आहेत आपणाला! कसे विझविणार ते? अंतःकरण पवित्र राखावयाचें. तेथें दुष्ट विचारांचा शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं. होत असेल तर कडक पहारा ठेऊन त्यांना आत येऊं द्यावयाचें नाहीं.

जें देवत्व तुम्हांला हवे आहे ते प्रत्यक्ष तुमच्याठायी आहे. ते स्वतःच्याठायीं पाहून इतरेजनांतही तें पहाण्याचा कसून प्रयत्न करा. सारे जग त्यानें व्यापलें आहे. त्याची तुम्हाला जाणीव मात्र झाली पाहिजे ती करून घ्या.

तुमच्या सभोवार पसरलेलें अफाट जग ही एक विशाल शाळाच आहे. येथें नाना प्रकारचे अनुभव तुम्हांला मिळतील. ते मिळवा व त्यापासून आपल्या जीवनांत योग्य तो बोध घ्या. डोळे उघडे ठेऊन पहा. कान आहेत त्यांचा सदुपयोग करा.

तेव्हां पुन्हां एकदां हेंच सांगावयाचें कीं पहिलें स्थान देवाला, दुसरें जगाला व तिसरें स्वतःला. हा जीवनमंत्र आचरणांत आणा. मग तुम्हाला या जीवनांत आनंद, सुख, समाधान व शांती यांचा लाभ भरपूर प्रमाणांत होईल.



उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'ल.यस.ॉफ तल' वापरा.
गिरगाव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

# श्रीदासगणू महाराज

************************

## जन्म, शिक्षण व पूर्ववृत्तांत

********************************

श्रीदासगणू महाराज यांचें पूर्वाश्रमींचें नाव नारायण होतें. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यातील अकोळनेर या गावी आजोळीं झाला. (शके १७८९). वडिलांचें नाव दत्तात्रय व मातोश्रीचें नाव होतें सावित्रीबाई. आजोबाचे नाव होतें एकनाथपंत. नारायण त्याचा फार लाडका होता. सावित्रीबाई पुत्रासह पतिगृही आल्या तेव्हा आजोबा त्याला मांडीवर घेउन कुरवाळून म्हणाले, "अरे! नारायण काय नाव ठेवलेत याचें! गुलामाचें पोट पहा ना! कसें अगदी गणपतीसारखें आहे. तेंच नाव शोभेल याला! कानसुद्धा पहा केवढे आहेत ते! याला यापुढें आता गणपतीच म्हणायचें बरें का!"

### गणपतीचे दासगणू झाले

झाले. त्यादिवसापासून नारायण हें नाव मागें पडून गणपती, गणेश हें नाव प्रचारांत आलें. पुढें गणपतीचें गणू व दासगणू झाले.

आजोबा एकनाथपंत यांना हा नातू फार आवडायचा. ते म्हणतच असत कीं; "हा माझा नातू फार भाग्यवान आहे. खूप लौकिक मिळवील हा!"

परंतु हें बाळ विद्याभ्यासांत फार कच्चे होतें. शिक्षणाकडे त्याचें दुर्लक्ष होतें. शिक्षणाकडे त्याचें लक्षच नसें. नवव्या वर्षी मुंज झाली. आतां तरी शिकण्या-सवरण्याकडे लक्ष लागेल अशी सर्वांची अपेक्षा, परंतु तिही फोल ठरली!

त्याचे चुलते जनार्दनपंत ते होते मामलेदार. त्यांनाही फिरतीवर असल्यामुळें या मुलावर देखरेख ठेवता येईना. स्वभाव भारी हट्टी व एककल्ली. शिक्षेचाही कांहीं उपयोग होईना. शेवटीं जनार्दनपंत हे सगमनेरास मामलेदार असता त्यानीं आपल्या पुतण्यास जवळ घेतलें. एका अर्धपदवीधर गृहस्थाच्या वर्गांत गणोबाना शिकण्यासाठी घातलें. त्या वर्गांत १४/१५ मुलें होतीं. त्याकाळीं मामलेदार म्हणजे मोठें प्रस्थ, त्यामुळें त्यांच्या पुतण्याशीं सहाध्यायी बिचकूनच वागत असत. त्या गावांत तमासे होत असत. बाहेरगावचे तमासगीर येत असत. चुलत्यास चुकवून कधी कधीं गावांतील तमाशास ते जात असत. त्याच्या कागाळ्या कोणी सागत नसे. या काळांत लावण्या, पोवाडे इत्यादि ग्राम्य गीताशीं दासगणूंचा संबध येऊन त्या काव्याबद्दल

आवडही उत्पन्न झाली. अनंतफंदी, रामजोशी, होनाजी बाळ हे त्याना आदर्शवत वाटूं लागले, त्यांच्याप्रमाणें आपणही कवनें करावीं व गावीं असें त्याना वाटूं लागलें.

अशारीतीने दासगणूना शिक्षणाची गोडी लावण्यात त्यांचे चुलते जनार्दनपत यानीही शेवटीं हात टेकले आणि इंग्रजी चौथींत असताच त्यांच्या शालेय शिक्षणाची इतिश्री झाली!

### ग्राम्य गीतांची आवड

झालें शिक्षण संपले. चौथीपर्यंत शिक्षण झालें तें तरी किती रखडत व अर्धवटच आले! त्यामुळें वाङ्मयाची आवड कशी लागणार. आवड उत्पन्न झाली ती ग्राम्य-गीतांची! कवित्वशक्ति जागी झाली परतु ती होती तमाशापुरती!

त्यानतर दासगणू नोकरीच्या मार्गे लागले. त्याच्या मावशीचे यजमान ब. ए. गोडबोले हे बडोद्यास मुन्सफ होते. तिकडे स्वारी गेली. त्यानीं खाजगीकडील एका खात्यांत त्यांना लहानशी नोकरी मिळवून दिली. तेथे रेखीव व आखीव काम. तो कार्यक्रम कांहीं त्यांच्या स्वभावास मानवेना. नोकरीधंदा सुरू झाला असें समजून वडील मंडळीनीं त्याच्या विवाहाचा बेत जुळवून आणून नारायणराव रानडे (जहागीरदार) याच्या कन्येशीं विवाह लावून दिला.

लग्नानंतर नोकरी सुटली. स्वारी नगराला परत आली. पुन्हां भटकण्याचा कार्यक्रम सुरू झाला. घरांत कुजबूज सुरू झाली. रोज खटके उडू लागले. दासगणूंची चुलती तिच्याने रहावेना म्हणून एकदां पटकन् म्हणाली, "काय चालविलें आहेस हे गणपती! कशाचा एवढा डौल मिरवतोस! शेवटीं आमच्याच नांवावर विकावे लागेल तुला! मी अमक्या तमक्याचा पुतण्या आहे याच पतीवर तोंड वेंगाडून तुला पोट भरावें लागेल. खूप समजून रहा!"

### गणोबा घराबाहेर पडले

दासगणू मानी स्वभावाचे! त्याना ते अपमानकारक शब्द शल्याप्रमाणें बोचले! ते ताडकन् तेथून उठले व जातांना काकीला उद्देशून म्हणाले, "काकी! पाणी पिण्यासही मी थांबणार नाही येथें! मात्र पक्के लक्षांत ठेवा कीं, कांही झालें तरी मी तुमचें नांव सांगणार नाही. लौकिक मिळविला किंवा उपाशीं मेलो तरी माझ्या एकट्याच्या नावावर जें काय करायचें तें करीन." असें बोलून ते जे घराबाहेर पडले ते कायमचेच!

विश्वनाथपत निसळ हे त्याचें एक विसाव्याचे ठिकाण होतें. त्याच्याकडे जाऊन त्यानीं घडलेली सारी हकिगत त्याना सांगितली. त्यांनीं त्याची समजूत घातली, धीर दिला व म्हणाले, "अरे! जाऊ दे रे! हें असेच चालायचें! काही काळजी करू

नकोस तूं ! माझ्या पानांतल्या अर्ध्या भाकरीत तुझा भाग आहे असें समज," किती प्रेमळ व धीराचे शब्द होते ते !

घरच्या मंडळींनीं समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु पुनरपि दासगणू घराकडे वळले नाहींत !

एकदा नगरच्या रस्त्याने हिंडत फिरत असतां पो. सुपरिंटेंडेन्ट केनर्डी यांची भेट झाली. जनार्दनपंतांबरोबर फिरतीवर असतां पूर्वी थोडीशी ओळख झालेली होती. साहेबानें प्रश्न केला—

"कुठें निघालास रे असा ?"

"उद्योग मिळविण्याच्या खटपटींत आहे !"

"कां रे ! आजच काय जरूरी पडली ?"

"घरीं परत जायचें नाहीं अशा निश्चयानें बाहेर पडलो आहें."

"मग पोलिसांत भरती होतोस का ? पहा ! तुझी नेमणूक करून घेतों !"

दासगणू सशक्त व बांध्यानें चांगले उंच होते. नंतर ते कचेरींत जाऊन साहेबास भेटले. दरमहा नऊ रुपये पगारावर श्रीगोंदें येथें त्यांना पोलिस शिपाई नेमण्यांत आलें ! दासगणू त्या नोकरीवर रुजू झाले.

घरच्या मंडळीस व चुलते जनार्दनपंत यास ही बातमी समजुन भारी दुःख झालें. ती अपमानास्पद नोकरी न करण्याबद्दल चुलत्यानें पुष्कळ सांगून पाहिलें. दुसरी चांगली नोकरी देतो म्हणून आश्वासन दिलें परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाही. एकदा पोलिस खात्यातील नोकरीला चिकटले ते कायमचेच !

### नोकरी पोलिस खात्यांत

पोलिस खात्यांत नोकरी. घरच्या वडिलधाऱ्या माणसांचा दाब संपला होता, वाटेल तें करण्याची पूर्ण मुभा होती दासगणूंना ! या काळांत त्यांची काव्यप्रतिभा प्रकाशांत येऊ लागली; परंतु ती लावण्या व पोवाडे यांच्या रुपानें ! त्यांना रसिकांकडून प्रोत्साहनहि मिळूं लागलें. दासगणू पोलिस खात्यांत होते, तमाशांत भाग घेत परंतु त्यांचे वर्तन निर्मळ व सोज्वल होतें असें त्याकाळीं त्यांना जवळून पहाणारे लोक सांगतात.

नोकरीचा आरंभ श्रीगोंद्यास झाला हें सांगितलें. तेथें असतां श्रीसद्गुरु वामनशास्त्री इस्लामपूरकर यांची भेट झाली. योगायोगाच्या गोष्टी. ते श्रीकल्याण महाराजांच्या परंपरेंतील सांप्रदायिक रामदासी होते, त्यांच्या एकंदर वागणुकीचा निरहंकाराचा व क्षमाशीलतेचा दासगणूंच्या मनावर फार इष्ट परिणाम झाला. भक्तिभावांत रंगलेले, भागवताचें पारायण करीत असतां नेत्र अश्रूंनी डबडबले असे त्यांनीं त्यांना एकदा पाहिलें. ते थक्क झाले. आपणास गुरुपदेश घ्यावयाचा आहे तो यांच्याकडूनच घ्यावा असा त्यानीं निर्धार केला.

### साईबाबा मार्ग दाखवतील

वामनशास्त्री श्रीगोंद्यास कांहीं कामानिमित्त आले होते. काम संपतांच ते जाणार होते. तत्पूर्वी दासगणूची व त्यांची भेट झाली तेव्हां दासगणूंनीं त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून मला पदरात घ्या व उपदेश देऊन कृतार्थ करा अशी विनंती केली. शास्त्रीबुवानीं त्याना झिडकारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु त्याचा उपयोग झाला नाही. त्यानीं त्याची मनीषा शेवटी पूर्ण केली. वामनशास्त्री नतर दुसरीकडे निघून गेले. या मंत्रग्रहणानंतर उभयताची भेट दोनतीनदां झाली. शास्त्रीबोवा पुढें फार दिवस राहिले नाहींत. एकदा दासगणूसह ते पंढरीस गेले होते. तेथें मी काशीस जाऊन लौकरच देह ठेवणार आहें असें ते एकदां त्यांना म्हणाले. तसेंच दौंडास येऊन भेट असेही सागितलें होतें. तेथून शास्त्रीबुवांस भुसावळला जावयाचें होतें. दोघेही आगगाडीनें बरोबर निघाले. भुसावळ जवळ येतांच शास्त्रीबुवानीं आपल्या प्रिय शिष्यास जवळ घेऊन प्रेमानें कुरवाळलें व जें सांगायचें तें त्यांना सागितलें. भुसावळ येथून शास्त्रीबुवानी दासगणूना परत पाठविलें, व जातांना त्यांचें सांत्वन करून सागितलें की, "वेड्यासारखे दुःख करू नकोस. हा मुळीं मृत्यु-लोकच आहे. त्यातून मी नित्याचाच दुरावणार आहे असें नाहीं. दोनतीनदां शिरडीस गेला होतास ना? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझेंच स्वरूप मान. आम्हीं दोघे एकरूप आहोत. तेच यापुढें तुला वेळोवेळीं योग्य मार्ग दाखवितील."

### शिर्डी माझे पंढरपूर !

हा आदेश घेऊन दासगणू तेथून निघाले व त्यावेळेपासून 'शिरडी माझे पढरपूर। साईबाबा रमावर' अशी त्यांची स्थिति झाली. दासगणू साईबाबांचे परम भक्त झाले ते त्या वेळेपासून.

याच प्रसगास अनुसरून भक्तिसारामृतात दासगणूंनीं साईबाबाना उद्देशून पुढीलप्रमाणें विनंती केली आहे.

हे श्रीसाई समर्था । तुझ्या पदी ठेवून माथा ।
करितों विनंती हीच आता । ती उदारपणे मान्य करा ॥
मी सकल संतांचा चरणरज । माझी राखा आपण लाज ।
तुम्ही भवाब्धीचें जहाज । हें म्यां पक्कें जाणले ॥
हीच विनंती साईनाथा । या वामनशास्त्र्यांच्या छात्रा ।
नको लोटूं कदा परता । बाबा दासगणूसी ॥
माझे गुरू मरून गेले । पोरकेपण मजला आलें ।
म्हणून पाहिजे संभाळिलें । या पोरक्या गणूसी ॥
तुम्ही एकरूप अवघे संत । तुम्हांमाजीं नसे द्वैत ।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात् । आहांत बापा मजलागीं ॥

# श्रीदासगणू आणि कान्ह्या भिल्ल

**श्रीदासगणूंच्या जीवनास निराळें चळण लावण्यास कारणीभूत झालेल्या ज्या अनेक गोष्टी नोकरीत असतांना घडल्या, ज्यामुळें त्यांच्या अंतःकरणांतील परमार्थाची आवड अधिक दृढमूल झाली, अशा घटनांत कान्ह्या भिल्लाच्या तपासाकरितां गुप्त हेर म्हणून रहावें लागलें; या प्रसंगास बरेंच महत्त्व आहे.**

कान्ह्या भिल्ल म्हणून एक दरोडेखोर सन १८९८ चे सुमारास बराच गाजला होता. त्याला धरण्याकरिता मोगलाईतील व इंग्रजीतील पोलिसांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण त्या सर्वांच्या हातावर तुरी देऊन कान्ह्यानें आपला धुडगूस चालूच ठेवला होता. त्यानें अनेक गांवें लुटली. शेठसावकाराचे बळी घेतले. कित्येकांची नाकें कापली. पोलिसांच्याहि रक्ताचे पाट वाहविले. पूर्व सूचना देऊन दिवसाढवळ्या डाके घातले. लोकांचें जीवित वा वित्त भरवंशाचें उरले नाहीं. या कान्ह्याला पकडण्यासाठीं सरकारनें गुप्त हेर नेमण्याचें ठरवून बऱ्याच ठिकाणांहून हुशार शिपायांचीं नांवें मागितलीं.

## गुप्तहेर म्हणून नेमणूक

त्या वेळच्या एका पोलीस अधिकाऱ्याचे व दासगणूंचे थोडे वितुष्ट होतें. त्यानें दासगणूंचें नाव वर कळविलें आणि या धोक्याच्या कामावर हटकून नेमणूक व्हावी, या हेतूनें 'गणेश दत्तात्रय हा चाणाक्ष शिपाई असून गुन्ह्याचा तपास फार चांगला करतो.' असें आपलें प्रशस्तिपत्रही जोडलें. त्याप्रमाणें 'कांहीं गुप्त कामावर तुमची नेमणूक केली असून आपलें काम हाताखालच्या शिपायांवर सोपवून नगरच्या मुख्य पोलीस कचेरींत दाखल व्हावें,' अशी दासगणूंना आज्ञा झाली. हें धोक्याचें काम आपणांकडे येऊं नये म्हणून त्यांनीं पुष्कळ खटपट केली; पण उपयोग न होतां गुप्तहेर म्हणून कान्ह्याच्या तपासासाठीं जावेंच लागलें.

पाथर्डीपासून १०–११ कोस दूर असलेल्या मोगलाईतील लोणी या गांवी रामदासाच्या वेषात ते येऊन राहिले. लोणीच्या गंगाराम पाटलाशीं कान्ह्याचा संबंध आहे, अशी कुणकुण असल्यानें या भागांत शोध करण्याची आज्ञा श्रीदासगणूंना झाली होती. रामदासी वेषाकरितां आवश्यक असलेलें, कुबडी, रामनामी चिपळ्या, दासबोध, ज्ञानेश्वरी, पांढऱ्या घोंगड्या इत्यादि साहित्य त्यांना सरकारी खर्चानें मिळालें. सद्गुरूपदेशामुळें मी रामदासी झालोच आहे, तेव्हां सोंगच घ्यावयाचें तर तें त्यांतल्यात्यांत खरें असावें; या कल्पनेनें रामदासी वेष दासगणूंनीं पत्करला होता.

लोणी हें गाव जरा डोंगराळ भागांत आहे. गांवाभोवती थोडी झाडी असून जवळच पाण्याचा खळखळ वाहणारा ओढा होता. गावात एक लहानसे राममंदिर आहे. पुढें सोप्यासारखे पाच खण व मागे छोटासा गाभारा. आत एका ओट्यावर रामरायाच्या वनवासी वेषातील काळ्या शिळेच्या लहानशा मूर्ति. अगदी साध्या माडणीचें माळवदी घरवजा तें मंदिर होतें. याच ठिकाणी श्रीदासगणू-छे! आतां रामदासीबुवा येऊन उतरले.

## रामरायाची सेवा

मंदिर जुनें असून किती तरी दिवसात त्याकडे कोणीहि लक्ष दिलें नव्हतें. याची माक्ष सर्वत्र पसरलेला केर, पाचोळा, पाकोळ्याची उबट घाण, आढ्याला लोंबकळणारीं मळकट जळमटें पाहून पटण्यासारखी होती. अशा स्थितीत देवाची पूजा कित्येक दिवसांत झाली नव्हती. हे सागण्याची गरज नाही. देवापुढें कांही उत्पन्न नसल्यानें पुजाऱ्याला रामसेवेची स्फूर्ति कशी व्हावी? निःस्वार्थपणे परमार्थ करणारे किती आढळणार! "सर्वः स्वार्थवशात् जनोऽभिरमते कस्यास्ति को वलभः" हें सर्वथा सत्य आहे.

मंदिराची अशी ही दैना व राममूर्तीची अनास्था पाहून दासगणूंना मनापासून वाईट वाटलें. त्याचे डोळे भरून आले. श्रीरामाच्या पायावर मस्तक नमवीत ते म्हणाले, "रामराया, आपल्यामागे सदाचा वनवासच का हो?" स्वतः पांच सहा तास खपून त्यांनीं पाकोळयांचीं घरटी, केरकचरा झाडून झटकून सर्व मंदिर स्वच्छ केलें. शेण आणून सारवूनहि टाकलें. वाण्याकडून ऊद आणून त्या ठिकाणी जाळला. आतां त्या स्थानाला थोडें तरी मंदिराचें स्वरूप आले. प्रभुरामचंद्राची पूजा करणें, हा श्रीदासगणूच्या भाविक हृदयाला अत्यंत आनंद देणारा व्यवसाय होता. अगदीं मनापासून तासन् तास ते त्यात रममाण होत. गुप्त वेशात असूनहि या कामी कृत्रिमतेचा लवलेश नव्हता. ओढ्यावर जाऊन रानकण्हेरीची बरींचशीं लांबडीं पांढरीं फुलें वेचून आणावीं आणि त्याच्या माळा गुंफून दाशरथीला अर्पण कराव्या. पवमान, रुद्राची आवर्तनें म्हणत अभिषेक करावा. स्वयंपाक करून नैवेद्य समर्पावा. दुपारी विष्णुसहस्रनामाचे १२ पाठ म्हणावे व संध्याकाळी दासबोध, ज्ञानेश्वरी वाचावी. रात्रीं भजन करून निद्रा घ्यावी. दिवसभर याच पारमार्थिक कार्यक्रमांत देव देव करीत मग्न असावें. कोणाशी विशेष बोलूं नये. अन्यत्र कोठें जाऊं नये. समोर सरळ पहात ओढ्यावर जाऊन स्नान करावें व सरळ परत येऊन मंदिरांत बसावें.

## खारका, शेंगा व गूळ

अशा रीतीनें कांही दिवस लोटले. हळू हळू देवळांत दर्शनाकरितां, पोथी ऐकण्यासाठी वा भजनकीर्तनाला बरीच मंडळी येऊं लागली. रामापुढें काही धान्य,

खारका, शेंगा, गूळ असे पदार्थ येऊं लागले. क्वचित् पैसेहि येत. रामदासीबुवांनीं खारका, गूळ, शेंगा ठेवून घ्याव्या आणि धान्य व पैसे देवळाचा पुजारी बाळंभट यास नेण्यास सांगावें. अर्थात्च रामदासीबुवाविषयी बरेंच कुतूहल निर्माण होऊन गांवकऱ्यांत नानाप्रकारचे तर्कवितर्क होऊं लागले. भिन्न भिन्न कंड्या उठूं लागल्या. कोणी म्हणे, 'हा खराच रामदासी आहे.' दुसरा म्हणे, 'असेल कोणी लुच्चा. तोंड चुकवून येथें येऊन राहिला आहे?' कोणी म्हणे, 'हा पोलिसचा गुप्त हेर असावा.' त्यांत हा खराच रामदासी आहे, असें म्हणणाऱ्यांची बहुसंख्या होती. ते म्हणत, "पोलिसाला किंवा एकाद्या लुच्चा चोराला पवमान, रुद्र कोठून येईल? ज्ञानेश्वरी, दासबोध कसा कळेल? हा तर अहोरात्र देव देव करीत असतो. किती भाविकपणें देवाचें करतो पहा ना! किती घाण होतं हें मंदिर? आतां येथें आलें कीं कसं बरं वाटतं! खरोखरच हा साधुवृत्तीचा असल्यावाचून इतकी शांति, इतका निस्पृहपणा कसा असेल?" लोकांची रामदासीबुवाविषयींची भक्ति हळू हळू वाढत गेली. तरी पण हा गुप्त हेर असावा, असें म्हणणारीं २–४ माणसें होतींच. त्यापैकीं अंताजीपंत कुळकर्ण्यांनें तर बुवाचा ठाव घेण्याच्या दृष्टीनें आपल्याकडून बराच प्रयत्न केला.

**माझा रामराय समर्थ आहे**

"काय बुवा, ठीक चाललें आहे ना? कांहीं अडचण असेल तर सांगा हो! आम्हीं तुमचेच आहो. तुम्हाला लागेल ते साहाय्य करण्याविषयीं तुमच्या वरिष्ठ पोलिसकचेरींतून लिहून आलें आहे."

"तुमचा कांहीं घोटाळा झालेला दिसतो आहे अंताजीपंत. पोलिसकचेरीचा आणि माझा काय संबंध? मला रामदाशाला गरज ती कशाची लागणार? माझा रामराय समर्थ आहे."

कुळकर्ण्यांच्या मनांतील संशय नाहीसा झाला नाहीं. बुवा पक्का आहे. त्यापुढें आपली मात्रा चालणार नाहीं, हें मात्र तो समजून गेला.

रामदासीबुवांनीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतांना फारच सावधपणा ठेवला होता सध्याकाळी रानांतून आल्यावर गुराखी मुलें देवळात जमत. रामापुढें आलेल्या पदार्थांतून वगळून ठेवलेल्या खारका, शेंगा, गूळ या वस्तु मुलाना वाटल्या जात. बुवा या पोराशीं मात्र मोकळेपणानें बोलत. "आज तुझी गुरें कोणत्या डोंगरावर गेली होतीं? तिकडे लांडग्याची भीति आहे का? तुझीं गुरें किती? दूध किती निघतें?" अशा आस्थेनें विचारपूस करणारा भेटल्यावर मुलें मोठ्या प्रेमानें सर्व सांगत. क्वचित् एकाद्या दिवशीं 'गावचा पाटील कोण आहे? गांवांत प्रमुख माणसें कोण? हे काळे पोलीस कशाला येतात?' असें विचारावें. मोकळ्या मनाचीं मुलें सर्व माहिती देत.

'कान्ह्या भिल्ल गंगाराम पाटलाकडे येतो. त्याला धरण्यास हे शिपाई येतात.' इत्यादि गोष्टी मुलें सांगत.

## भविष्य सांगूं लागले !

एक दिवस बुवानी गंगाराम पाटलाच्या मुलाचा हात सहज पाहिला आणि ऐकीव माहितीच्या आधारावर त्याला म्हटलें, 'तुला दोन आया आहेत नाहीं रे ? तुम्ही तीन भावंडें. तुझ्या थोरल्या बहिणीचे लग्न झालय, होय ना ?' मुलाला हे ऐकून मोठें नवल वाटलें. त्याने हें वृत्त बापास जाऊन सांगितलें. हात पाहून ज्योतिष सांगणारा भेटल्या वर, 'माझा हात पहा' असें कोण म्हणणार नाही ? साधारणपणें तो एक नादच असतो माणसाना ?

दुसऱ्या दिवशीं गंगाराम पाटील राममंदिरांत आले. 'माझा हात बघा कीं जरा अशी त्यांनी बुवाना विनति केली. बुवांनीं प्रथम आढेवेढे घेतले. दुसरेच विषय काढले. शेवटी 'उद्या सकाळीं या. मग हात पाहतो.' असें सांगितलें. बुवांच्या बोलण्या-चालण्यातील गंभीरपणाचा पाटलाच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. दुसरे दिवशीं सकाळीच पाटील बुवाच्याकडे आले. बुवानी बराच वेळ त्या हातावरील बुध, गुरु, शुक्र यांचे उंचवटे पाहिले. आडव्या उभ्या रेषांचे जाळे निरखिलें. निरनिराळ्या बोटावरची नी मुठीवरची इतर चिन्हें हात पालथा उताणा करून न्याहाळलीं. शेवटी 'चांगला आहे की पाटील तुमचा हात' एवढेंच सांगून ते स्वस्थ राहिले. एवढ्यानें ऐकणाराच्या मनाचें कसे समाधान होणार ? पाटलानीं 'असे काय ! नीट सांगा ना महाराज !' असे पुन्हां पुन्हा विनविल्यावर बुवा हळूच म्हणाले, "पाटील, तुम्हाला संतति, संपत्ति चांगली आहे. संसारसुखहि लाभेल. पण तुम्हांला होणारा द्रव्यलाभ चोरांपासून होईल वा झाला असेल, चांगल्या मार्गानें नाही." ही अंतरीची खूण पाटलाना लागलीच पटली. त्यांची दृढश्रद्धा रामदासी-बुवावर बसली.

## बुवांची चंगळ झाली

आता पाटलांच्या घरून दोन्ही वेळां बुवांकरितां गाईचे दूध येऊं लागले देवापुढचें धान्य नी पैसे मिळत असल्यानें संतुष्ट झालेला बाळंभट पुजारी हा दशम्या करून आणून देत असे. यामुळें खाण्यापिण्याची पंचाईत नाहींशी झाली. गांवांत मानसन्मानहि बराच वाढला. पाचपचवीस नमस्कार घेण्याकरितां थांबल्यावाचून रस्त्यानें जाणे कठीण झालें. भजन व पोथी यांना दाटी होऊं लागली. एकंदरींत रामदासबुवा हे खरे साधु, साक्षात्कारी सन्त आहेत, अशी लोकांची दृढभावना झाली. अंतोबा कुळकर्ण्यांच्या मनातील अविश्वासहि डळमळला.

या सर्व धडामोडींत श्रीदासगणूंच्या अंतःकरणांत उठणारे विचारतरंग त्यांच्या मनोवृत्तींवर प्रकाश टाकणारे आहेत. लोकांची स्वतःविषयींची नी पूज्यबुद्धि पाहून ते व्याकुळ होत. श्रीरामचंद्राच्या मूर्तीपुढें बसून त्यांनीं प्रतिदिनीं क्षमायाचना करावी. "रामा, या भाबड्या लोकांची मी वंचना करीत आहें. लोक मला साधु समजून भजतात. माझ्यामुळे यातल्या किती जणांवर तरी संकट येणार आहे! माझ्या कृतघ्नपणाला रामा, तूं कोणती शिक्षा देणार आहेस?"

वेषाकरितां म्हणून कराव्या लागणाऱ्या पूजापाठादि कृत्यात विलक्षण गोडी वाढू लागली. धर्माचरणात किती उदात्त सुख साठविलें आहे, त्याचा थोडासा तरी अनुभव येऊं लागला. स्वतःशी ते आणीकहि एका गोष्टीची छाननी करीत. लोकांत साधुत्वाचा गवगवा आहे. बरेच लोक भजनी लागले आहेत. एवढ्यानेच एकाद्या व्यक्तीस सत्पुरुष मानणें धोक्याचे आहे. दुसरें असें वाटे की, थोड्याशा चांगल्या वर्तनाला जर एवढें फल मिळतें, तर ज्याचें आचरण अन्तर्बाह्य शुद्ध सात्त्विक झालें आहे; तो केवढ्या योग्यतेस चढेल!

## मस्तकावर मृत्यूची तरवार

कान्ह्यानें त्याच्या मागावर असणाऱ्यांची हत्या किती अमानुषपणें केली, त्या भयंकर वार्ताहि कानावर येत. श्रीदासगणूंच्या सवेंच गुप्त हेर म्हणून नेमलेल्या दोघांस कान्ह्यानें यमसदनास पाठविल्याचें समजलें होतें. त्यांतील मलकप्पा नागप्पा या वाण्याच्या वेशानें हिंडणाऱ्या शिपायास तर कान्ह्यानें कुऱ्हाडीनें सरपणासारखा तोडला होता. मृत्यूची ही धाड केव्हां कोसळेल, याचा मुळीच नेम नसल्यानें जीव नेहमीं टांगणीला लागल्यासारखा असे. लोकांची फसवणूक करावी लागते आहे, नी मरणाची तरवार सदैव डोक्यावर टांगलेली आहे, याला कारण ही पोलिसची नोकरी. बुवांनीं म्हणूनच देवास प्रार्थना करावी, कीं—

"नको नोकरी ही मला पोलिसाची।
बहु भ्रष्टवी कष्टवी चित्त साची।
मला त्यांतुनी सत्वरीं सोडवावे।
रमानायका, चित्तिं माझ्या वसावें॥"

असें तें एक करुणाष्टक आहे. या श्लोकातील अर्थाकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर श्रीदासगणूंच्या मानसातील खळबळीचें प्रतिबिंब त्यांत पूर्णपणें उमटलें आहे, असें अनुभवात येईल. विशेषत; 'बहु भ्रष्टवी कष्टवी चित्त साची' या ओळींतील भाव तर वर वर्णन केलेल्या मानसिक विकारातील अर्थ मूकरूपानें सांगणारेच आहेत.

एक दिवस कान्ह्या भिल्ल गंगाराम पाटलाकडे रात्रींचा आला आणि त्यानें पाटलास विचारलें---

"तो रामदासी कोण आहे पाटील ?"

"तो चांगला साधु आहे. नाईक, त्याला मुळींच त्रास देऊं नका."

"साफ खोटें. तो पोलीस आहे. मी पक्की माहिती काढली आहे. चला आता त्याच्याकडे जाऊं."

## कान्ह्या भिल्लाशीं गांठ

दोघेजण राममंदिरांत आले. कान्ह्याच्या हातात दारू ठासलेली तोड्याची बंदूक होती. पाटलांनीं बुवांना जागे केलें.

कान्ह्याची ती काळी, कुळकुळीत, ठेंगणी, पिळदार बांध्याची, उग्र मुद्रा असलेली, पुष्ट शरीराकृति पाहताच बुवांचें धाबें दणाणलें. प्रत्यक्ष काळ मृत्युपाश घेऊन उभा आहे, असें वाटलें. भीतीनें जिवाचा थरकाप झाला. कान्ह्याने दरडावून विचारलें, "कोण आहेस तूं ! तुझं नांव गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे. तुझा बकल नंबर ७२७. खरें आहे कीं नाहीं बोल !"

कान्ह्यानें बित्तबातमी मिळविलेली पाहून बुवा त्याहि स्थितींत आश्चर्यानें थक्क झाले. आपल्या जोडीदारांची याच दरोडेखोरानें नुकतीच काय दशा केली आहे, तेंहि आठवलें. जीविताची उरली सुरली आशाहि नष्ट झाली. तोंड भीतीनें कोरडें पडलें. छाती धडधडूं लागली. मुखावाटें शब्द उमटेना. कान्ह्यानें पुन्हा दरडावतांच दासगणू चाचरत अडखळत म्हणाले, "बाबा, मी वाई-साताऱ्याकडील पांडववाडीचा राहणारा आहे. तूं हें पोलीसबिलीस काय म्हणतोस, तें मला माहीत नाहीं. समर्थांच्या जन्मभूमीचें दर्शन घ्यावें, म्हणून जांबेस गेलों होतों. परत येतांना आमच्या गांवाकडे प्लेग असल्याचें कळलें म्हणून येथे राहिलों. माझें आयुष्यच सरलें असलें, तर तूं काय करणार ? मार तुझ्या मनात आहे तर. मी आत जाऊन रामाच्या पायांवर डोकें ठेवतों. मागून तुझी बंदूक चालव." असें म्हणून कान्ह्याच्या होय, नाहीं, म्हणण्याची वाट न पाहतां रामदासीबुवा भरदिशी गाभाऱ्यात आले. प्रभु रामचंद्रास घट्ट मिठी मारली आणि दीनपणें म्हणाले, "रामा, तुझ्या पदरांत आहे. योग्य वाटेल तें कर." पायांवर मस्तक टेकलें व बुवाचे भान हरपल्यासारखें झालें. अत्यंत भयानें थोडी मूर्च्छाच आली म्हणा ना !

## रामरायानेच बचाव केला

मृत्यूच्या भीतीनें मिठी मारलेल्या मार्कंडेयास यमपाशांतून सोडविणारे भगवान् शंकर ज्याचें ध्यान प्रेमानें करितात तो जानकीपति रामराय पदनतीची उपेक्षा करी

करील ! कान्ह्या भिल्लास काय वाटलें कोणास ठाऊक ! रोखलेली बंदूक मागें घेऊन तो तसाच परत फिरला. मंदिराच्या बाहेर आल्यावर त्यानें पाटलास बजावलें, 'या बुवास गावांतून जाऊं देऊं नका. मी पुन्हा एकदां शोध काढून येतों.' कान्ह्या गेल्यावर मंदिरांत जाऊन लोकांनीं बुवास सावध करून गाभाऱ्याबाहेर आणलें,

श्रीदासगणूंनीं यानंतर वरिष्ठांस गुप्तपणें पत्र लिहून कळविलें कीं, 'माझ्याविषयीं लोकांस संशय आला आहे. तरी युक्तीनें त्याचें निराकरण करावें.' त्याप्रमाणें लवकरच एक दिवस श्री. मारुती पंढरीनाथ या नावाचे एक पोलीस इन्स्पेक्टर लोणीस आले आणि इकडे तिकडे तपास करून स्वारी मंदिरात आली. बुवांच्या सचेपणाविषयीं संशय दाखवून फरारी माणसाची तपासणी करतात, तशी बुवांची अंगझडती घेऊन ते पाटलास म्हणाले, 'हा कान्ह्याचा हस्तक असावा. पांडववाडीकडे आम्ही याचा तपास करतों, तोंवर यास हलूं देऊं नका.' या प्रकारानें उरल्यासुरल्या लोकांच्याहि मनातील संशय पार नाहीसा झाला.

एकदां लोणीपासून जवळच गंगाराम पाटलाचें गुन्हाळ लागावयाचें होतें. त्यानी हात जोडून रामदासीबुवांना विनति केली. 'महाराज, आपण आलें पाहिजे. नाईकहि येणार आहेत.' बुवानीं उत्तर दिलें, "मला ब्राह्मणाला कशाला बोलावतां ? नाइकाला (कान्ह्या भिल्लाला) जेवणावळ म्हणजे वेडेंवाकडे शिजणार ! अशा ठिकाणीं मीं येणें बरें नाहीं. परत येतांना एकादा ऊस आणा म्हणजे झालं."

## कान्ह्या शिताफीनें निसटला

कर्तव्याला अनुसरून दासगणूंनी 'कान्ह्या भिल्ल अमुक ठिकाणीं अमुक वाजतां येणार आहे. तरी योग्य ती व्यवस्था व्हावी.' असे वर कळविलें. त्याप्रमाणें पन्नास पोलिसानी अन्याच्या वाडीस गराडा दिला. गोळीबार सुरू झाला. कान्ह्याला पकडण्यास पोलीस आले आहेत, असें कळतांच पाटलाची तिरपीट उडाली. ते तसेच धावत मंदिरांत आले आणि बुवांस म्हणाले, "महाराज, नाईकाला शिपायानीं घेरलें आहे. नाईक यांतून सुटावे, म्हणून रामाची प्रार्थना करा. आपल्या आशीर्वादाशिवाय नाईकाना यश येणार नाही."

इकडे पोलिसांनी घेरलें, तरी कान्ह्या डगमगला नाहीं. तो हाडाचा शूर होता. तो एका टेकडीवर चढून गेला. उभय पक्षीं गोळ्या झडूं लागल्या. शेवटी त्याने त्या टेकडीवरील गवत पेटविलें आणि त्या धुराच्या लोटांतून मोठ्या छातीनें पोलिसांचा वेढा फोडून तो निघून गेला. या झटापटींत कान्ह्याचे कोणीच दगावलें नाहीं. चार पोलीस मात्र ठार झाले. कान्ह्या सुखरूप निसटला तो रामदासीबुवांच्या कृपेनेंच, अशी भाबड्या पाटलाची ठाम कल्पना झाली.

पुढें कांहीं दिवसांनीं लोणीस आला असतांना कान्ह्या पाटलास म्हणाला, 'पाटील, हा रामदासी पोलीसच आहे रे.' पाटलाला आतां जरा बळ आलें होतें. ते म्हणाले, "वेड लागलंय की काय तुला नाईक? त्यांच्या आशीर्वादानें त्या दिवशीं तूं शिताशिशीं सुटलास पोलिसाच्या तडाक्यातून. तूं त्यांना पोलीस म्हण; पण त्या दिवशीं त्यांना तुझा साथीदार म्हणून एका पोलीस इन्पेक्टरनें किती छळलें! त्याना शिव्या काय दिल्या, अंगझडती काय घेतली! मी मध्यें पडलो, म्हणून मारहाण तरी झाली नाहीं. बापडा सात्त्विक ब्राह्मण! देव देव करीत राहिला आहे. त्याच्या पाठीस कां लागतोस उगीच?"

### भिल्लाचें समाधान

कान्ह्या भिल्लाचें समाधान झालें, असें दिसलें. तो पाटलासह दर्शनाकरिता म्हणून मंदिरांत आला. पायां पडत असताना बुवाच्या पायांवरील वहाणाचे घट्टे पाहून कान्ह्याचा संशय पुन्हां बळावला. रामदासीबुवांकडे निरखून पाहात तो म्हणाला, "बुवा, तुमच्या पायावर तर पोलिसी वहाणाचे घट्टे दिसताहेत." बुवा मनात चरकलेच. पण प्रसंगावधान राखून त्यांनीं उत्तर दिलें, "आमच्या कोंकणात आम्ही वहाणाच घालतों बाबा." हें उत्तर कान्ह्याला योग्य वाटलें. त्यानें लवून नमस्कार केला आणि गळ्यांतील १६ तोळ्यांच्या सोन्याचा सात पदरी गोफ श्रीदासगणूंच्या पायावर ठेवून तो म्हणाला, "महाराज, कोणत्या इन्स्पेक्टरनें तुम्हाला शिव्या दिल्या, सांगा. पंधरा दिवसांतच त्याचा मुडदा न पाडीन तर भिल्लाच्या पोटचा म्हणवणार नाही."

यावर दासगणू म्हणाले, "हें बघ. माझ्याकरितां कोणास मारूं नकोस! त्याला संशय आला म्हणून त्यानें तसें केलें. मागें तूं नव्हती कां बंदूक रोखलीस! आपल्या कपाळीं असतील ते भोग भोगलेच पाहिजेत. तुझा हा गोफहि मला नको. मला याचा काय उपयोग? तूं आपला हा परत ने." पण कान्ह्या तो परत घेईना. तेव्हां श्रीदासगणूंनीं तो गोफ तेथेंच पाटलाच्या स्वाधीन करून 'यातले तीन पदर बाळंभटास द्या आणि बाकीचे मोडून मोडकळीस आलेल्या मंदिराची डागडुजी करा.' असें शपथ घालून सांगितलें. पाटील आणि कान्ह्या दोघेहि थक्क झाले. ही निरिच्छ वृत्ति उसनी वा वरपांगी नव्हती. ती त्यांच्या हृदयाची सहजवृत्ति होती. पैसा न खाणें, हा जेथें केवळ अपवाद आहे; त्या पोलीस खात्यात नोकरीस राहूनहि अशा द्रव्याची इच्छाहि दासगणूंनीं कधी केली नाहीं.

### दासगणूंचा निरिच्छपणा

खर्डें या गावाच्या परिसरांत भामट्याचा अगदी सुकाळ असे. खर्ड्यास बदली व्हावी, म्हणून शिपायानीं सत्यनारायण करावेत. इतका द्रव्यलाभ त्या गावात होत असे.

कारण मामलत्यांच्या मिळकतीतील ठराविक भाग पोलिसांचा असावयाचाच. अशा खर्ड्यांस ज्या वेळीं दासगणूंची नेमणूक झाली, त्यावेळीं त्यांनी तेथें थोडीहि लांच घेतली नाहीं; त्यामुळें इतर कोणाहिपेक्षां भामटे त्याना बचकून असत. या कारणानें त्यांच्या कारकीर्दीत गुन्ह्यांची संख्या एकदम घटली. अशी माहिती दासगणूंच्या समकाली खर्ड्यांस असलेले शिक्षक श्री. अमृत बापूजी रसाळ यानीं दिली. खरोखरीच पोलिसात नोकरी असूनहि, पोलिसी वृत्तीपासून दासगणू अगदी अलिप्तच राहिले.

अलीकडे त्यांच्यावर रचलेल्या एका अष्टकात त्या वेळच्या परिस्थितीस अनुसरून असें वर्णन केलेलें आहे.—

“ जरी अधम चाकरी, कवन हीनशी लावणी।<br>
निकृष्ट जन भोंवती, परि न लिप्त तद्दुर्गुणीं।<br>
पटासह असूनहि जर खरा न कीं रंग तो।<br>
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितों॥”

भरजरी वस्त्राचें मूल्य त्यातील जराच्या खरेंखोटेंपणावरच अवलंबून असतें. नाहीं का? खरा जर वस्त्रासवें रंगत नाही, त्याप्रमाणें दासगणूंचा जीवनपट बहुविध प्रसगाच्या भल्याबुऱ्या रंगात बुचकळला गेला असला, तरी त्यांत विपुलपणें भरलेला शुचितेचा जर त्या सर्व रंगापासून उज्ज्वलपणें अलितच राहिला आहे. पोलिसाच्या नोकरींत असतांनाहि जेथें ही वृत्ति होती, तेथें पुढील आयुष्यांत अनेक संस्थानिकांनीं वेळोवेळीं देऊं केलेली सहस्रांनी मोजतां येईल अशी बिदागी त्यांनी कटाक्षानें नाकारली असेल; तर त्यात आश्चर्य करण्यासारखें काय आहे? असो. प्रस्तुत आपल्याला हें ‘कान्ह्या भिल्ल प्रकरण’ संपवावयाचें आहे.

### सरकारकडून सहाबारी पिस्तूल

कान्ह्या भिल्लाला पकडणें कठीण आहे, असें अनुवास आल्यावर सरकारच्या मनांत एक निराळाच विचार आला. कान्ह्या भिल्ल हा श्रीदासगणूच्या समोर बराच वेळ येतो, असें पाहून वरिष्ठ अधिकाऱ्याकडून दासगणूस आज्ञा झाली कीं, “तुम्हांस एक सहाबारी पिस्तुल देण्यांत आलें आहे. त्यानें कान्ह्यास जायबदी करून पकडावें. त्यात त्याच्या जिवास धोका झाला तरी अडचण नाहीं. माणिकदौंडीच्या ठाण्यावर शक्य तितक्या लवकर येऊन सामान स्वाधीन करवून घ्यावें.” त्याप्रमाणें श्रीदासगणू कांहीं तरी निमित्त काढून मोठ्या युक्तीनें लोणीच्या बाहेर पडून माणिकदौंडीस आले. तेथें त्याना सहाबारी पिस्तुल, काडतुसें, सहामाहीचा पगारभत्ता, उत्तम बातम्या पुरविल्या-साठीं पारितोषिक आणि कान्ह्या भिल्ल सापडतांच एकदम दोन जागा वर बढतीचें आश्वासन, असे सर्व मिळालें.

ते सर्व घेऊन दासगणू मिरजगावास आले. तेथील सरकारी दवाखान्यावर त्याचा एक जिवलग स्नेही ( श्री. अण्णाजी पांडुरंग बार्शीकर कुलकर्णी ) डॉक्टर होता. श्रीदासगणूंनी मनाशी विचार केला, " मी ब्राह्मण, कोणाच्या रक्तानी आपले हात रंगविण, हे चांगले नाही. त्यातून निशाण मारताना माझी गोळी एकदाहि टारजेटास लागली नाही. फुकटचा पगार खातो, नालायक आहे, अशी वरिष्ठांची बोलणी मी वरचेवर खाल्ली आहेत. अशा परिस्थितीत कान्ह्यावर झाडलेली गोळी त्याला लागेलच कशावरून ? गोळी चुकताच कान्ह्या आणि त्याचे साथीदार माझा जीव घेतल्यावाचून राहणार नाहीत. तेव्हा कसेंहि करून आता हा प्रसंग टाळलाच पाहिजे." त्यांनी ही सर्व परिस्थिति आपल्या डॉक्टर-मित्रास सांगितली.

## डॉक्टरांनी बचावलें

डॉक्टर म्हणाले, " गणपतराव, काही चिंता करू नका ! मी माझ्या आधिकारात एक महिनाभर तुम्हास रोगी म्हणून येथें ठेवू शकतों. मात्र बाहेर फारसे हिंडूं नका आणि हजामत करू नका." डॉक्टरानीं दासगणूचे नाव रोगी म्हणून नोंदविलें आणि ' गणेश दत्तात्रय हा आजारी झाल्यानें त्याला येथे ठेवून घेतलें आहे. त्यांच्याजवळील जोखमीचें साहित्य, कागदपत्र व पोलीशी गणवेश ठाण्यावर परत पाठवीत आहे.' असे वर कळविले. वरिष्ठांकडून तातडीनें उत्तर आले. ' गणेश दत्तात्रय हा आमचा फार महत्त्वाचा माणूस आहे. त्यास नगरच्या मोठ्या दवाखान्यांत नेण्यास आम्ही समक्ष येत आहोत. वरिष्ठ येण्याच्या सुमारास डॉक्टरने दासगणूस काही औषध दिले. त्यामुळे त्यांना बराच ताप चढला. वरिष्ठ अधिकाऱ्यानीं दासगणूंना नगरास नेण्याचें निश्चित केले. आता मात्र या संकटातून कसे पार पडावे, ते समजेना, पण परमेश्वरकृपेनें दासगणूंना पुन्हां या संकटात पडावे लागले नाही.

श्री. नानासाहेब चांदोरकराच्या ओळखीचे श्री. बोस या नावाचे एक डॉक्टर नगरास नुकतेच बदलून आले होते. श्री. नानासाहेबांकडून येथे वशिला लागला. त्याने ' या माणसाचे हृदय अशक्त झाले आहे. कोणत्याहि धोक्याच्या जागी पाठ-विण्यास हा अयोग्य आहे.' असा अधिकृत दाखला श्रीदासगणूना दिला. वरिष्ठ अधिकाऱ्याचा निरुपाय झाला आणि दासगणूची नेमणूक पुन्हा जामखेडास झाली. अशा रीतीने दासगणूच्या पुरते तरी ते प्रकरण समाप्त झाले.



# श्रीसाईबाबा व श्रीदासगणू महाराज

**********************************************

## कांहीं उद्बोधक प्रसंग

*****************************

शिरडीस असताना श्रीसाईनाथाच्या अलौकिक विभूतिमत्वाचा श्रीदासगणू महाराजांना अनेक रीतींनी अनुभव आला. त्यामुळेच 'शिरडी माझे पंढरपुर । साईबाबा रमावर' असे ते अंतःकरणपूर्वक मानूं लागले.

आजकाल श्रीसाईबाबांच्या व्यक्तित्वाभोवती चमत्कारांचें इतकें दाट जंगल वाढलें आहे की, श्रद्धावंत मनुष्यहि त्यामुळें गांगरावा आणि घायाळ व्हावा. कोणाला पुत्रप्राप्ति झाली. कोणाचे रोग गेले. कोणाला नोकरी मिळाली. कोणाचे लग्न झाले. कोणी गुन्हा करून शिक्षा न होतां सुटला. कोणाला काळ्या बाजारांत अतोनात फायदा झाला. कांहींना स्वप्नदृष्टांत झाले. नारळ, उदी, अक्षता यांचा प्रसाद अलौकिकरीत्या मिळाला. कोणाला साईबाबांचें प्रत्यक्ष दर्शन झालें. श्रीसाईबाबा कोणाच्या अंगात येतात. कोणाच्या येथे त्यांच्या पावलांचे ठसे उमटले. कोणाशी ते प्रत्यक्ष बोलतात तर कोणाच्या बोलण्याची जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर गेल्या दहा पधरा वर्षांत तर या प्रकारच्या चमत्कारांचें जणुं पेंवच फुटलें आहे.

### श्रीदासगणूंचे अनुभव

१९४० सालापूर्वी जेथें नित्याच्या आरत्यांसहि माणसांचा तुटवडा भासत असे, घंटा बडविणाऱ्या पुजाऱ्याव्यतिरिक्त मंदिरांत सात आठ माणसें कांही आरतीसाठीं नसत, यामुळें संस्थानांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं, संस्थानच्या सर्व नोकरांनी प्रत्येक आरतीला उपस्थित राहिलेंच पाहिजे, असा नियम केला; तेथें आज उत्सवाच्यावेळीं अथवा गुरुवारसारख्या विशेष दिवशीं तर राहूं द्याच पण एरवीहि काकडआरतीसुद्धां सर्व वेळीं शें-दोनशें लोक सहजच उपस्थित असतात. श्रीसाईबाबा हे जणुं आजच्या काळाचें एक वेड बनले आहेत. रावापासून रंकापर्यंत, लहानापासून थोरापर्यंत, पदवी-धरापासून आंगठेबहाद्दरापर्यंत, सनातनी शास्त्रीबोवापासून सिनेमानटापर्यंत सहस्रावधि लोक शिर्डीस गोळा होतात. अनेक चमत्कार त्यांच्याविषयी विपुलतेनें सांगतल जातात. त्यांच्या खरेंखोटेंपणाविषयीं मला येथें कांहीच सांगावयाचें नाही. श्रीदास-गणूंची श्रीसाईबाबांच्यासंबंधीं निष्ठा व त्यांना आलेलें अनुभव सर्वसाधारणांच्यापेक्षा वेगळ्या जातीचे आहेत, हे मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे.

मुंबई प्रांतामध्ये वा आज सर्व हिंदुस्थानभर श्रीसाईबाबांच्या अलौकिकत्वाचा जो एवढा प्रचार झालेला आहे, त्याला मूळ कारण श्रीदासगणू महाराजच आहेत. महाराजांच्या श्रुतिमधुर कीर्तनामुळेच सर्वसाधारण समाज श्रीसाईबाबांच्या संतत्वाशी परिचित झाला. श्री. नानासाहेब चांदोरकरामुळें कांही सुशिक्षित, श्रीमंत आणि वरिष्ठ अधिकाराची मंडळी तेवढी श्रीसाईबाबांची भक्त बनली. यासाठीच श्रीदासगणू महाराज व श्री. चांदोरकर यांना उद्देशून श्री. गोविंदराव दाभोळकर उर्फ हेमाडपंत यांनी आपल्या श्रीसाईचरित्रामध्ये "मुंबई प्रांती जी साईभक्ति। त्यास कारण या दोन व्यक्ति। साईबाबा कृपामूर्ति। यांचे हाती प्रगटले ॥" असा उल्लेख केला आहे.

## विशेष घडणें जरूर

श्रीदासगणू महाराज श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त बनले. श्रीसाईबाबांनी केलेल्या अनुग्रहाचे स्मरण होताच ते गहिवरून जात. याला अगदी किरकोळ म्हणता येतील, असे ऐहिक सुखे पुरविणारे चमत्कार कारणीभूत नाहीत. पोलिसांत आयुष्याची काही वर्षें काढलेल्या श्रीदासगणू महाराजासारख्या चोखंदळ बुद्धीच्या पुरुषाची श्रद्धा स्थिर होण्यास सामान्यापेक्षा काही तरी विशेष घडणेंच अवश्य होतें. वर उल्लेखिलेल्या चमत्कारांना चमत्कार म्हणावयास ते तयार नाहीत.

संतत्वाच्याभोवती सामान्य ऐहिक सुखे पुरविल्याच्या चमत्काराचे तण उगवणें, हे अत्यंत स्वाभाविक असते. कारण अपेक्षेची धाव यापलीकडे बहुधा जात नाही. काही वेळा खरोखरीच संतांच्या कृपाप्रसादामुळे भाविकांना ती ती ऐहिक सुखे प्राप्त झालेली असतात, तर पुष्कळ वेळा श्रद्धाळू मनाचा तो एक भाबडा समज असतो. श्रीदासगणूंच्याविषयींहि अशा रीतीचे चमत्कार सांगणारे लोक आहेत, हे अनेकांस अनुभवाने माहीत आहे. अशा लोकांना श्रीदासगणूमहाराज काय उत्तर देतात, तेहि अनेक वेळा ऐकिले आहे.

एका गृहस्थाने महाराजांना भाविकपणे अगदी गहिवरून सांगितलें, "महाराज, केवळ आपल्या आशिर्वादाने माझा अगदी मरणाच्या दारी पडलेला मुलगा वाचला"

महाराज म्हणाले, "वेड्या, अरे असे जर असतें तर माझा रामू मी का मरूं दिला असता?"

आणखी एक गृहस्थ एकदा म्हणाले, 'महाराज, मला आपण पुष्कळदा स्वप्नात दिसता."

"हा माझा गुण नाही. तुमच्या मनावर घडलेल्या संस्काराचा आणि धरलेल्या

भावनेचा तो परिणाम आहे. माझ्याशिवाय स्वप्नांत इतर कोणी दिसत नाही का? दिसते ना? झालें तर. स्वप्नात दिसणे हा कांही साक्षात्कार नव्हे."

उदाहरणाकरितां केवळ दोन गोष्टी येथे उल्लेखिल्या. अनेकाना त्यानी याप्रमाणे झिडकारिले आहे. आपल्याविषयी कोणी काही अलौकिकत्व प्रस्थापित करील असा नुसता वास येताच त्यानी अनेक प्रकार करून त्याची या प्रकारची श्रद्धा टिकणार नाही, असें केले आहे. महाराजांच्याकडे निरनिराळ्या दर्जाची, वेगवेगळ्या वृत्तीची, भिन्न भिन्न परिस्थितीतील माणसें किती तरी येत असत. काही त्यांच्याजवळ वर्षानुवर्षं राहिलींहि आहेत. त्यांच्याशी होणारे महाराजांचें वागणें, बोलणे पाहिले म्हणजे मन अचंब्यानें थक्क होत असे.

व्यावहारिक दृष्टीनें पाहतां, किती तरी विविधता आणि विसंगति त्यात आढळते, परंतु या परस्परविरोधाच्या मुळाशी एकच सामान्य सूत्र आहे; असे निश्चितपणें प्रत्ययास आलें आहे. मनुष्याच्या श्रद्धेला, आदराला व भक्तीलाहि एक प्रकारच्या ऐहिक स्वार्थाचें अस्तर कळत न कळत लागलेलें असतें आणि या सापेक्षतेपायींच परमार्थाचे खरें सुख हातीं येत नाही. हें अस्तर नष्ट करणें, ही सापेक्षता दूर करणें हेंच महाराजांच्या हेतूचें सूत्र होय. परमार्थाचा उपयोग ऐहिक स्वार्थसाधनाकरिता करणे हे महाराजाना त्याज्य वाटलें. अनंतराव आठवले यांच्याकडे वर्षातून अनेक वेळां निरनिराळ्या उत्सवाच्या निमित्तानें दोन चार ब्राह्मण बोलावून रुद्रपवमानाच्या आवर्तनासह षोडशोपचारें करण्याची पद्धति आहे. त्याची मुंज झाल्यापासून तेच ही पूजा करीत असत. त्याची पूजेचा संकल्प सामान्यतः 'अस्माक सहकुटुंबानाम् क्षेमस्थैर्यायुरारोग्यैश्वर्याभिवृद्ध्यर्थम् अमुक देवतानाम् पूजनम् करिष्ये' असा असतो. यालाच 'श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थम्' ची परंतु श्रीदासगणू महाराजानी हा परंपरागत संकल्प ब्राह्मणाना कधीहि उच्चारूं दिला नाही. त्याचा नेहमीचा संकल्प 'श्रीपांडुरंगदेवताप्रीत्यर्थम् पाण्डुरंगपूजनंच करिष्ये' असा असतो. अनंतरावानी विचारल्यावरून त्यानी एकदा त्याचे स्पष्टीकरण केले होते. त्याचा उपयोग त्यानी अधिकमासवर्णनाच्या वेळी केला आहे. त्या ओळी येथे उद्धृत करतो.

"पूजा सकाम ना व्हावी आज्ञा श्रीगुरूची अशी ।
देवासी काळजी सारी मागावे काय त्याजसी ।
दादांनी कथिला विप्रा, तदा संकल्प यापरी ।
प्रीत्यर्थं पांडुरंगाच्या, पूजार्चन घडो करीं ॥"

### तो लग्नांतील अहेर नव्हे

भक्तीचे स्वरूप असे सामान्य व्यावहारीक कधी असता कामा नये. भक्तीकरिता केलेली सेवा हा काही इष्टमित्राच्या लग्नात केलेला आहेर नव्हे की, खण द्यावा आणि लुगड्याची इच्छा धरावी. जी गोष्ट—

शेठ विस्मयापन्न । करूं स्मरण लागती ॥ शिरडीस पूर्वी आलो नाही । कोणासवे न पाठविले काही । ऐसे असतां आश्चर्य काई । महाराज साई वदती हे ॥ मग अज्ञापन घेतले । रतनजी परतून नांदेडा आले । जे जे जैसें जैसें घडले । साविस्तर कथिले गणुदासा ॥ तीन रुपये चौदा आणे । त्वा मज दिले ते मी जाणे । बाबाचे हे काय बोलणे । सांगा स्पष्टपणे मज सारें । हा तरी एक चमत्कार । दासगणू करिती विचार । काय असावे यांतील सार । मनाचा निर्धार होईना ॥ आठवे पूर्ण विचारांती । एक अवलियाची मूर्ति । मौलीसाहेब जया वदती । आठवती चित्ती बुवांच्या ॥ जातीचे हे मुसलमान । कार्यक्रम संतासमान । धंदा हमालीचा करून । प्राक्तनाधीन वर्तती ॥ शिरडीस जाणे ठरल्यावरी । मौलीसाहेब यांची फेरी । सहज शेठजीचे घरी ॥ स्वेच्छाचारी जाहली ॥ शेठजीस होऊन प्रेरणा । दिधला मौलवीस छोटा खाना । तेथील खर्चाची कल्पना । स्मरली तत्क्षणा गणुदासां ॥ खर्चाची यादी आणविली । पै न पै सर्वही धरिली । तयाची एकंदर केली । बेरीज झाली बरोबर ॥ तीन रुपये चौदा आणे । तंतोतंत अधिक ना उणे । तयांची पावती बाबांनी देणे । आश्चर्य बहुगुणे सर्वत्रां ॥''

सतामधील ही एकती श्रीसाईबाबांच्या साहचर्यात अनेक वेळा प्रत्ययास आल्यानें श्रीदासगणू हे त्या विचाराशीं अगदी एकरूप झालेले दिसतात. त्यांनी आपल्या सर्व ग्रंथभर संतांच्या या अलौकिक एकत्वाचा अनेक वेळां, अनेक प्रकारानी उल्लेख केला आहे.

### एक उल्लेखनीय प्रसंग

अध्यात्म मार्गातील तत्त्वज्ञानासबंधीच्या श्रीदासगणूमहाराजाच्या कांही शंकाहि श्रीसाईनाथानीं मोठ्या युक्तीने दूर केल्या आहेत. त्यातील एक प्रसंग विशेष उल्लेखनीय आहे.

श्रीदासगणूमहाराज त्या वेळीं ईशावास्य उपनिषदावर ओवीबद्ध टीका लिहित होते. या अर्थगंभीर उपनिषदाचा पहिलाच श्लोक—

"ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत ।
तेन त्यक्तेन भुंजीथाः मागृधः कस्यस्वित् धनम् ॥"

असा आहे. यातील 'तेन त्यक्तेन भुंजीथाः' 'त्यागपूर्वक त्याचा उपभोग घे.' या सूत्रातील अर्थ कांही केल्या श्रीदासगणूंच्या मनाला उलगडेना. त्यागपूर्वक उपभोग म्हणजे काय ? त्याग आणि भोग हे परस्परांच्या अगदी विरुद्ध त्यांना एकत्र आणणे म्हणजे वदतो व्याघातच. टीकाटिपणे पाहिली, संस्कृत-भाष्यें अवलोकिली, शास्त्रीमंडळींना विद्वानांना, प्रवचनकारांना विचारिलें; पण मनाचें समाधान कोठेच झाले नाही. प्रथमग्रासे असा मक्षिकापात झाल्यामुळे श्रीदासगणूंना फारच खेद होत होता. सारखा विचार ते करीत. तासचे तास चिंननात घालवींत, पण 'तेन त्यक्तेन भुंजीथाः' हे कोडेच राहिले. पुढे शिरडीस गेले असताना श्रीसाई-बाबांच्या पुढें त्यानी आपली ही शंका नमस्कारपूर्वक मांडिली. शंकेचे उत्तर बाबांनी कांहीच दिलें नाही. त्यांनी विचारलें.

"येथून कुठें जाणार आहेस गणू ?"

"विलेंपारल्यास श्री. काकासाहेब दीक्षिताकडे."

"मग काकाची मोलकरीण देईल तुझ्या या प्रश्नाचें उत्तर."

इतर मंडळींना या बोलण्याचें फार आश्चर्य वाटलें. प्रश्न उडवून देण्याचा तो एक मार्ग आहे असे वाटले त्यांना; परंतु श्री. दासगणूंच्या मनांत मात्र तशी शंका आली नाही. बाबांच्यावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. मोलकरीण सांगेल याचा अर्थ, तिच्या निमित्तानें आपला प्रश्न सुटणार असेच ते समजले आणि नेमके त्याप्रमाणेंच घडलें.

## दिक्षित आणि श्रीदासगणू

श्री. काकासाहेब दीक्षित आणि श्रीदासगणू यांचा संबंध पुढे पुढे फारच जिव्हाळ्याचा झाला होता. राधाकृष्णाआईच्या प्रकरणी जरी दोघांत पुष्कळ मतभेद झाला होता, तरी उभयतामधील स्नेहांत त्यामुळे कधीं तूट आली नाही. उदार माण-साच्या निरपेक्ष प्रेमामध्ये हे असेंच घडतें. माझ्यासारखा कधी होशील, अशी भावना त्यांच्या मनात कधीच येत नाही. एकमेकांच्या आचारविचारांना जर स्नेहाचा जाच होत असेल, तर तो खरा निरपेक्ष स्नेह नव्हेच. दीक्षितांची मैत्री ही खरी मैत्री होती. श्रीदासगणू महाराज मुंबईला आले की, त्यांचे राहणें बहुधा विलेंपारल्यास श्री. हरि सीताराम दीक्षित यांचेकडे असे. त्याप्रमाणें यावेळींहि ते श्री. काकासाहेब दीक्षिताकडेच उतरले. तेथें श्रीसाईबाबांनी सांगितल्याप्रमाणें घटना घडून आली.

श्रीदासगणू महाराज हे सकाळच्या वेळी पूजेस बसले होते. बाहेर मोलकरणीची लहान बारा तेरा वर्षांची एक मुलगी भांडी विसळत एका जरतारी साडीचें गाणें गात होती. त्या दिवशी कांही विशेष सण असल्यामुळें घरांतील मुली चांगलीं चुंगली वस्त्रें वावरत होत्या. या गरीब पोरीच्या अंगावर मात्र फाटकें पटकूर होतें. त्यामुळे ती फार खिन्न होती व साडीचें गाणें गातांना तिचा स्वर मोठा दीन आणि करुण भासत होता. तें पाहून दासगणू महाराज त्यांना भेटावयास आलेल्या रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान या सद्गृहस्थाना म्हणाले, "मोरेश्वरराव, या मुलीला द्या ना एखादी चांगली साडी आणून. सणावाराचे दिवस. बिचारी लक्तरें नेसून हिंडत आहे." श्री. मोरेश्वररावानी लागलीच ती गोष्ट मान्य केली. बाजारातून एक उत्तमपैकी साडी आणून त्या मोलकरणीच्या मुलीला देऊन टाकली. कधीं कल्पनेंतहि येणार नाही, अशी देणगी मिळाल्यानें त्या मुलीला अर्थातूच फार आनंद झाला. संतोषानें तिचा चेहरा अगदीं उजळून निघाला. तिचें फुललेलें समाधान पाहून दोघा-नाहि फार बरे वाटलें. दुसऱ्या दिवशीं तीच मुलगी पूर्वीचेच फाटके कपडे नेसून कामावर आली होती आणि कालचेंच गाणे म्हणत होती; परंतु गाणे म्हणत असतांना तिचा भाव आज सर्वस्वी वेगळा होता. गाण्यांतल्या जरतारी साडीची ती आज मालकीण होती. नवे वस्त्र अंगावर नव्हतें; पण मुद्रेवर कालची खिन्न दीनताहि नव्हती. उलट प्रसन्नता होती.

## साक्षात्कार झाला

श्रीदासगणू महाराजांनी ज्या वेळीं हें सर्व दृश्य पाहिलें, त्या वेळी त्यांच्या जाति-वंत कविप्रतिमेला 'तेन त्यक्तेन भुंजीथा' यांतील गूढ अर्थाचा एकदम साक्षात्कार झाला आणि अवर्णनीय आनंदाने त्यांचे हृदय भरून आले. सर्व जगत् ईश्वरानेंच व्याप्त असल्यानें ईश्वरावेगळा कोणी राहूंच शकत नाही; तेव्हां जगांतील सर्व पदार्थ माझेच आहेत मीच त्यांचा मालक आहे. ही भावना एकदां अंतःकरणांत जागृत झाली की मग ती वस्तु प्रत्यक्ष जवळ आलीच पाहिजे असे नाहीं. व्यापक अनुभूतीमुळे वस्तुवांचूनहि तिच्यापासून होणारे सुख भोगतां येतें. मोलकरणीच्या त्या मुलीजवळ पहिल्या दिवशीं साडी नव्हती. आणि मिळालेली साडी ती घरीच ठेवून आल्यामुळें दुसऱ्या दिवशीहि तिच्याजवळ साडी नव्हतीच; परंतु साडी माझी झाली आहे, या केवळ भावनेनेंच मुलगी आनंदित झालेली होती. याच भावनेनें जर माणूस जगात वागेल तर त्याच्या मनांत लोभ हा कधी उत्पन्नच होणार नाही. आणि त्याचा आनंद कधीहि मळणार नाही. 'हें विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाचि स्थिर। किंबहुना चराचर। आपणचि जाहला॥' ही ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णिलेली परमोच्च स्थिति ज्याच्या अंगीं बाणली, त्याला हव्यास कशाचा उरणार? आणि मग प्रत्यक्ष न

भोगताहि म्हणजेच त्यागाने जगातील सर्व भोग भोगून होणारा आनंद त्याला उपभोगता येईल. हाच ' तेन त्यक्तेन भुंजीथाः ' या सूत्राचा अर्थ. श्रीसाईसच्चरित्र-कारांनी आपल्या ग्रंथाच्या अध्याय वीसमध्ये या प्रसंगाचे विस्ताराने वर्णन केले आहे. जिज्ञासूंनी ते तेथे पाहावे.

' ईशावास्य भावार्थ बोधिनी ' टीकेतील श्रीदासगणू महाराजांच्या या सूत्रावरील काही ओव्या येथे अवतरित करणे उचित वाटते.

" ज्याची इच्छा करशील पाह्य । ते अवघे ईश्वरमय । ईशे व्याप्त जगत्त्रय । तूंही न वेगळा त्यापासुनी ।। मग इच्छा कशाची । तूं वापा करणार साची । जग ही मूर्तीच ईशाची । वेगळे त्या मानूं नये ।। जे जे कांही जगतांत । ते ते तुझेच आहे सत्य । म्हणोनियां एषणांकित । होऊं नये सूज्ञांनी ।। पैसा पुरून जमिनीसी । तो सावकार मानी मजपाशी । प्रत्यक्ष पाहता त्यापासी । एकही कवडी दिसेना ।। तें अवघे पुरलेलें धन । सावकार मानी माझे म्हणून । त्याचा अर्थ इतकाच जाण । मनात आणिता उपयोगी ।। खरे पाहता ते धन । वेगळे न ईशाहून । इच्छा करिता सावकार जाण । तोही न वेगळा त्याहुनी ।। सागरे का इच्छावे क्षारपण । दिनकरे का तेज जाण । वा साखरेनें गोडपण । इच्छावे का सूज्ञ हो ।। जे ज्याच्या जवळ आधीच आहे । त्याची इच्छा न करिती पाहे । जैसें सागर सूर्य शर्करा हे । नेच्छिती क्षार, तेज गोडी ।। तैसेंच या जगतांत । जे जे कांही आहे सत्य ।। ते ते अवघे तुजप्रत । उपभोगितां येईल की ।। आप आणि पर । हे भेद । नुरावे साचार ।। जगत् जे दिसे आडंबर । ते अवघा तूंच की ।। ही भावना ज्याचे मनी । रूढ झाली असे जाणी । तोच म्हणावा महाज्ञानी । ब्रह्मवेत्ता निश्चयें ।। "

### तळमळ उत्कट असावी

विचार परिपक्व झालेले असले, मनोभूमि श्रद्धायुक्त असली आणि एखाद्या प्रश्नाच्या उत्तराविषयी चित्ताची तळमळ उत्कट असली की, संताच्या बारीक सारीक सूचनेतूनहि ज्ञान कसे प्राप्त होऊ शकते, याची ही वरील घटना एक उत्तम उदाहरण आहे.

लहान मुलाला मऊ भात करून पुन्हा पुन्हा कालवून गुरगुट्या करून इवलाले घास देत काऊचिऊच्या गोष्टी सांगत भरवितात, त्याप्रमाणें परमार्थांतहि सद्गुरूंनीं

करावे, अशी सामान्याची अपेक्षा असते, लहान मुलाप्रमाणे सर्व कांही आयते हवें असते, पण बालकाप्रमाणे मनाचा मोकळेपणा, निष्पाप भाव, आणि अनन्यता मात्र असत नाही. सर्व गोष्टी सद्गुरूंनी पतकराव्या, आपण फक्त एकदा केवळ शरीराने नमस्कार केला म्हणजे झाले, अशी जी लोकाची कल्पना असते ती खरोखरीच व्यर्थ आहे. संतांचें माहात्म्य सामान्याच्या मनावर ठसवावे, 'संतचरणरज लागता सहज । वासनेचे बीज जळून जाय ' अथवा ' आपणासारिखे करिती तात्काळ । नाही काळवेळ तयालागी ' यासारखी कांही संतवाक्ये असलीं तरी त्यांचे प्रयोजन नीट लक्षांत घेतले पाहिजे. सद्गुरुचे काम हे पदवीनंतरच्या अभ्यासासाठी असलेल्या मार्गदर्शकासारखे आहे. ते फक्त काहीं सूचना देतील. बाकीचा सर्व प्रयत्न विद्यार्थ्यांनीच करावयास पाहिजे. स्वतःचें सर्व अहंकार, सर्व तऱ्हेचे स्वार्थ, सर्व वासना आणि इच्छा याचा संपूर्ण त्याग करून जर कोणी सद्गुरुच्या चरणी अनन्य होऊन मस्तक नमवील तर मात्र गोष्ट वेगळी; पण ही योग्यता काहीं सहजासहजीं प्राप्त होणारी नव्हे. एकनाथ महाराजांनीं ' मंत्रतंत्र उपदेशिते । घरोघर गुरू आईते । जो शिष्यास मिळवी सद्वस्तुतें । सद्गुरू त्यातें कृष्ण मानी " असे जें म्हटलें आहे, त्यातील भाव साधकांनीं लक्षात घेतला पाहिजे.

श्रीदासगणू महाराजांची मनोभूमि श्रीसाईनाथाच्या सहवासांत कशी कशी तयार होत जात होती, हें या वर उल्लेखिलेल्या घटनांतून स्पष्ट होणारें आहे,

---


MATUNGA CLANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# माझी प्रार्थना

—रविंद्रनाथ टागोर

हे भगवंता ! तुझ्या चरणाशी माझी जर कोणती एकमेव प्रार्थना असेल तर ती हीच की, माझ्या अंतःकरणात जें दैन्य, जो दुबळेपणा वास करीत असेल त्याच्यावर जबरदस्त टोला हाण !

माझ्या वाट्यास जी जी दुःखें येतील किंवा जे जे आनंदाचे प्रसंग येतील त्या त्यावेळीं मी डगमगून जाणार नाही किंवा बेहोषही होऊन जाणार नाही अशी शांत वृत्ति माझ्या वाट्याला येऊं दे.

सेवाभावातच मला, आनंदाचा लाभ होईल, तोच आनंदाचा ठेवा असे मला वाटूं दे.

मी गोरगरिबांकडे केव्हांही तुच्छतेनें पहाणार नाही, ती माझीच भांवडे आहेत अशी त्यांच्याकडे पहाण्याची मला दृष्टि दे त्याचप्रमाणें उद्धटपणे दुसऱ्यांना ठेचूं पहाणाऱ्या सामर्थ्यापुढें मी माझें डोकें वाकवणार नाही असें कर.

रोजच्या रोज मनाला व्यग्र करणारे बारीक सारीक प्रसंग किती तरी घडतात. त्याना न जुमानता किंवा त्याची खंत न बाळगतां मी माझें मस्तक सतत उंच ठेवीन असें कर.

माझ्याठायीं जी शक्ति असेल ती मी प्रेमभावानें तुझ्या चरणी अर्पण करीन, तुझ्याच कारणी ती लावीन एवढे कर म्हणजे झालें !

---


**लहान मुलांच्या आंकडीवर**

जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

## महाराष्ट्राचा संतकवि हो वैकुंठासी गेला !

[ चाल : **थकलेरे नंदलाला** ]

महाराष्ट्राचा संत कवि हो ! वैकुंठासी गेला ऽ ऽ ।
वैकुंठासी गेला ॥ ध्रु० ॥
दासगणूंच्या निधनाची ती वार्ता ऐकुनि कानी ।
प्रिय भक्ताच्या नयनांमधुनी टप टप गळले पाणी ।
महाराष्ट्रांतील भक्तजनांचा शोक अनावर झाला ॥ १ ॥
शिरडीच्या श्रीसाईंची बहु भक्ति त्यांना होती ।
दासगणूंच्या हृदयी निशीदिन राहे साई ज्योति ।
करील अल्ला भले चिरंतन आशिश होते त्याला ॥ २ ॥
वक्ता विद्वान लेखक कविवर होता धीर हुतात्मा ।
संत चरित्रे लिहिण्यासाठी तळपत होता आत्मा ।
साई सेवेमध्ये त्यांचा देह समर्पित झाला ॥ ३ ॥
कीर्तनी ज्याच्या भक्त रंगती डोलति ख्याति होती ।
संत चरित्रे लिहुनी दिधली प्रिय भक्तांच्या हाती ।
साई साई नाम स्मरोनि अमर पदासी गेला ॥ ४ ॥
संतचरित्रे–ओवी–ग्रंथ सुभाषितेही लिहिली ।
श्लोक–पवाडे–आणि तमाशा कितीक कवने केली ।
आरती रचुनी दासगणूने बोध आम्हाला केला ॥ ५ ॥
जनतेसाठी संत–चरित्रे लिहुनी सेवा केली ।
संत महंतांच्या कीर्तिची उंच पताका नेली ।
आधुनिक महिपती म्हणोनि भक्त गौरवी त्याला ॥ ६ ॥
धन्य धन्य ते दासगणू अन् धन्य तयांची गाथा ।
विनम्र होऊन भक्तगणांनो चरणी ठेवा माथा ।
सांगे रामा प्रिय भक्तांना श्रद्धांजलि द्या त्याला ॥ ७ ॥

—**रामा नलगुंडवार**, नागपूर

# श्रीदासगणू महाराज यांचा सूक्ति संग्रह

**श्रीदासगणू महाराज यानी अपरंपार काव्य रचना केली आहे. त्या काव्यांत मधून मधून सुटसुटीत, थोडक्यांत अर्थबोध करणाऱ्या व बोधप्रद अशा सूक्ति किंवा वचनें कितीतरी आहेत. शोधणारा व ग्रहण करणाराच पाहिजे. त्यांपैकी कांही थोड्या निवडक सूक्ति आमच्या वाचकांसाठी पुढें देण्यांत येत आहेत.**

१ त्यासीच म्हणावे संत । की जो न मानी जात गोत ।

२ द्रव्यहीना भूमीवरी । मान कोणी न देतात ।

३ पहा एका द्रव्यापुढे । कोण पाहे हरीकडे ।
कामुक भक्ताचे वाकडे । सहज शुद्ध ब्रह्मासी ।

४ नामी विश्वास ठेवावा । कवणाचाही न करी हेवा ।
अवघ्या मूर्ति पंढरीराया । पाहून लीन असावे ॥

५ सगुणावांचून निर्गुण । आले न कोणा कळून ।

६ जया कुळी जन्म झाला । त्या कुळींच्या व्यवसायाला ।
करण्या खऱ्या संताला । लाज मनी न वाटतसे ॥

७ दरबार ज्याचा मोकळा । त्याचाच जगी बोलबाला ।
जेथे लाग वारीला । त्याचे दैन्य लौकर पुढे ।

८ वादविवाद पंडितासी । रणमैदान शूरासी ।
तेवी संतती स्त्रियासी । ब्रह्मस्थानी वाटते ॥

९ हांसत कर्म करावे । तेच रडत भोगावे ।
म्हणून आधीच उमजावें । कर्म करता सूज्ञांनी ॥

१० ज्यानी ऐहिक टाकिले । त्यांना न कोठे भय उरले ।

११ शिष्य नसावा सापेक्षित । गुरु नसावा आशाळभू ।

१२ असा गेल्या भास्कर । ये दीपासी महत्व थोर ।
तैसे कर्म, भक्तिज्ञान दूर । झाल्या ज्योतिष बळावते ॥

१३ मोठे होणे सोपे हरी । परी ते टिकविणे कठीण भारी ॥

१४ जो खराच सिद्ध झाला । दंभ न स्पर्शे कधी त्याला ।
पहा मूळच्या सौंदर्याला । चट्टीपट्टीची गरज नसे ॥

# रामनामाचें सामर्थ्य

—डॉ. राजेंद्र प्रसाद

**महात्मा गांधीजीनीं या राष्ट्राला कितीतरी गोष्टी शिकविल्या आणि त्याला सामर्थ्यसंपन्न बनविलें. स्वतः सामर्थ्यसंपन्न असल्याशिवाय कोण कोणाला सामर्थ्य देऊं शकत नाही. मग महात्माजींनी जें सामर्थ्य संपादन केलें तें कशाच्या बळावर? त्यांनी भारतालाच सामर्थ्य दिलें नाही तर साऱ्या जगाला तें वाटलें!**

त्यांनी अनेक वेळां बोलून दाखविलें आहे व अनेक वेळा लिहिलेंही आहे की, मला सामर्थ्य देणारा परमेश्वर. माझें सामर्थ्य ही त्याची देणगी आहे. रामनामात बोलून दाखवितां येणार नाहीं अशी अचाट दैवी शक्ति सामावून राहिलेली असते. रामनाम काय वाटेल तें करू शकतें. त्यावर श्रद्धा मात्र पाहिजे. महात्माजींच्या मुखावाटे अखेरच्या क्षणाला कोणते बरें शब्द बाहेर पडले? 'हे राम!'

तुळसीदासजींनीं म्हटलें आहे कीं, मोठमोठे संत, सत्पुरुष असतात ते शेवटच्या क्षणाला रामनामाची आठवण व्हावी म्हणून झटत असतात. परंतु त्याच्याही बाबतींत तें घडतेंच असें मात्र नाहीं.

जन्मोजन्मीं त्यागमय जीवन घालवीत असतांही अंतकाळ येतो तेव्हा त्याला देवाचा विसर पडतो,

जगाचा कायमचा निरोप घेऊन जाण्याची घडी प्राप्त झाली असता ज्याला रामनामाची आठवण होते तो तसाच महा पुण्यवान् असला पाहिजे. त्याच्याकडून जन्मभर तसेंच पुण्याचरण व तपाचरण घडलें असलें पाहिजे.

गांधीजींचें सारें जीवन हें समर्पित जीवन होतें. त्यांनी जे जें केलें ते सारे देवाच्या नावानें, त्याचा आपण एक नम्र सेवक या नात्यानें त्यांनी केलें. त्यांच्या जवळ जें जें काही चागलें होतें, जें जे सामर्थ्य होते तें तें सर्व त्यांनी मानवजातीची पातळी उंच करण्यासाठी व जे खाली गेले होते त्यांना वर आणण्यासाठीं खर्च केलें. आणि जेव्हा जगाचा निरोप घेण्याची वेळ आली तेव्हा रामनामाचा जप करीत त्यांनी देह ठेविला!

देव, धर्म कशाला पाहिजे? कसली आली आहे दैवी शक्ति! असें म्हणण्यात आमच्यापैकीं कित्येकांना मोठा पुरुषार्थ वाटत असतो. देवाच्या नावाची आम्हांला पर्वा वाटत नाहीं. व त्याची जरूरीहि भासत नाहीं. पुष्कळांना देवाचें नाव घ्यायचें

म्हणजे मोठी लाज वाटते ! कित्येक माणसे देवाचे नाव घ्यायचें म्हणून मोठ्या जुलमानें घेतात ! त्याना मोठें संकट वाटतें ते !

ज्या श्रद्धेने व ज्या तळमळीनें महात्माजी रामाचे नाव घेत असत. ती श्रद्धा व ती तळमळ आमच्यापाशी आहे का ?

आमच्यावर येऊन गेलेल्या व सध्याहि आलेल्या नाना संकटाचा क्षणभर विचार करा. याचे मूलभूत कारण शोधू गेल्यास ते कुठे सापडेल, ठाऊक आहे ? आम्ही अजून स्वतःला बरोबर ओळखले नाही, ओळखण्याचा प्रयत्नहि केलेला नाही. मग आम्ही दुसऱ्याना काय बरे ओळखू शकणार ?

सर्वत्र परमेश्वर व्यापलेला आहे. तो माझ्याठायी आहे. त्याचप्रमाणें इतर सर्वांच्या अंतर्यामी त्याचेच वास्तव्य आहे. ही ओळख आम्हाला पटली म्हणजे राष्ट्राराष्ट्रामध्ये लढाया व तंटेभांडणें केव्हाहि होणार नाहीत.

हें जे सांगितले ते निव्वळ सत्य आहे. शंभर नंबरी सत्य आहे. त्याची जाणीवच नाही आम्हाला. म्हणून सारी भांडणे आणि तंटे !

एक माणूस दुसऱ्यास मारू शकतो अशी कल्पना उराशी बाळगणें हीच सर्वांत मोठी चूक आहे.

सर्वांनीं देवाची भक्ति करावी, त्याची प्रार्थना करावी, त्याला आठवावे असे गांधीजीना फार वाटत असे. कारण त्यामुळें माणसाचे जीवन सुधारेल, त्याच्या अंतःकरणांत प्रकाश पडेल, तो सद्गुणी बनेल व परोपकाराकडे वळेल असें त्याना वाटत असें.

त्याच्या जीवनांत प्रार्थनेला महत्त्वाचे स्थान होते. प्रार्थना हें त्यांचें जीवन होते. रोज सामुदायीक प्रार्थना करण्याचा त्यांनी परिपाठ ठेविला होता त्याचे तरी हेंच कारण होय.

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

## महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यास लागणारे सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तके
लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.
छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)
* आमचीं कोठेंही शाखा नाहीं. *

## पोंच व अभिप्राय

श्री. म. य. दळवी यांनी लिहीलेली व 'विज्ञान माला' व 'नाविन्य प्रकाशन' यांनी प्रकाशित केलेली खालील दोन मराठी पुस्तकें आमचेकडे आली आहेत :—

( १ ) अणु शक्तीचे रहस्य.

( २ ) उडत्या तबकड्या.

हल्ली विज्ञानात होणाऱ्या अकल्पित प्रगतीमुळें आश्चर्यकारक शास्त्रीय शोध पाश्चात्य देशांत सतत लागत असून तत्संबधी सामान्य जनांना माहिती देणारें व तरुणपिढीच्या शोधक बुद्धीला आव्हान देऊन खाद्य पुरविणारें वाङ्मय रशिया, अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांत सतत फार मोठ्या प्रमाणांत प्रसृत होत आहे. त्यापैकीं अत्यंत अल्प आपल्या देशांत येत आहे. व आपल्या देशांत सामान्य वाचकाला चटका लागणाऱ्या या शोधाबद्दल काहीच माहिती पुरविली जात नसून केवळ काल्पनीक गोष्टी ज्यापासून यत्किंचितही ज्ञान होत नाही असें भरताड वाङ्मयच प्रसृत होत आहे, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. या दोन पुस्तकांत सामान्य वाचकास कितीतरी शास्त्रीय माहिती मनोरंजक तऱ्हेनें पुरविण्यात आली असून प्रत्येक विद्यार्थ्यानें ही पुस्तकें जरूर वाचावीत व आपल्या ज्ञानांत भर घालावी अशी आमची शिफारस आहे. तसेंच प्रौढानीही ही वाचल्यास मनोरंजन व विज्ञानाची ओळख सहजच होईल. हा उपक्रम फारच स्तुत्य आहे. किं. रु. १ व आणे ८ फक्त.

---

## शिर्डी संस्थानतर्फे संरक्षण निधीस सहाय्य

उद्योग व कायदेमंत्री श्री. वानखेडे हे ता. २१ डिसेंबर रोजी शिर्डी येथे गेले असता तेथे त्यांचें युद्धजन्य परिस्थितीवर भाषण झाले. शिर्डी संस्थानच्या वतीनें रिसिव्हर श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे त्यानी त्यांस संरक्षण निधीसाठी पांच हजार रु. व १३५ ग्रॅम सोनें अर्पण केले.



# शिरडी वृत्त

## नोव्हेंबर १९६२

या महिन्यात शिर्डीस बाहेरगावची बरीच भक्तमंडळी श्रीसाईंचे दर्शनास आली होती. दिपवाळीचे सुट्टीमुळे रविवार व गुरुवार या दिवशी गर्दी फार होत असे. कांही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणे—

**कीर्तन**

सं. गवई विठ्ठलराव मराठे यानी कार्तिक शु. ११ व कार्तिक वा। ११ व श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी अशी तीन कीर्तने श्रींचे मंदिरात वरील दिवशी केली.

**गायन**

श्रीसहकारगायन पार्टी कल्याण, श्री. गुलाबबाई बेळगांवकर पुणे. श्री. आर. बोरकर सांताक्रूझ मुंबई ( गायन व बासरीवाद्न ) श्री. गोविंद दामोदर अग्नी मुंबई. सौ. चंपावती जोशी. मुंबई.

**हार्मोनियम वादन**

श्री. आय. एस. मिरजकर पुणें. श्री. मोरेश्वर कृष्ण पुरंदरे, मुंबई.

**तबलावादन**

श्री. ए. के. मिरजकर, पुणें. श्री. विजयकुमार चिंतामण साखळे, मुंबई.

**पालखी मिरवणूक**

कार्तिक शु। ११ निमित्त श्रींचें पालखीची गांवांतून मिरवणूक व गारुड भजन कीर्तन वगैरे कार्यक्रम झाले.

**मोठ्यांच्या भेटी**

आंध्रप्रांताचें विकास मंत्री महाशय शिर्डीस येऊन श्रींची पूजा अर्चा करून समाधान व्यक्त करून गेले.

**संतकवि कै. दासगणूमहाराज**

संतकवी ह. भ. प. दासगणू महाराज हे श्रीक्षेत्रपंढरपूर मुक्कामी मिती कार्तिक वा। १३ रविवार दिनांक २५।११।६२ रोजी साईचरणीं विलीन झाले. त्याप्रित्यर्थ संस्थानचे अधिकारी मे. रिसीव्हरसाहेब यानी तावडतोब संस्थान नोकर सेवेकरी यांची दुखवट्याची सभा घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. दुखवट्याचा ठराव करून तो पंढरपूर मुक्कामी त्यांचे पौत्र श्री. अनंतराव आठवले यांचेकडे पाठवून दिला. श्रीदासगणू हे श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त, सेवक व साईंची कीर्ति वाढविणारे प्रख्यात कवी, कीर्तनकार होते.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम. रोगराई कांहीं नाहीं.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N S Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu translation) | by joga Rao | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगाष्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ही | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपीत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नावे) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spirctual Symphony** | | by R S Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Sidi lights on Sai Baba** | (Eng) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP and 37 nP for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs 15) *Can be had from* (मागवा) :

1 **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
P O Shirdi Dst Ahmednagar

2 **Sai Baba Office 'Sai Niketan',**
Dr Ambedkar Road, Dadar, Bombay 14



★

संगीताची मोहिनी
माणसाला मंत्रमुग्ध करते
त्याचप्रमाणें कुठल्याहि
हृदयंगम चित्राची मुद्रणकृति
वाचकाला नयनमुग्ध करते

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ x ८, १० x १४, १४ x २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.